म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय काव्य
दा. क्रं. ११३८८
IRBK-0111397
IRBK-0111397

११९९९३ eco.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

11 DEC 1970

12 JUN 1972

1 JUL 1972

72-729

4 JAN 1974

18 JUN 1974

JUN 1974

JUL 1974

9 AUG 1974

22 OCT 1974


27 OCT 1974


14 MAR 1975

14 JUL 1975

10 JUN 1976

9 DEC 1976


भाग



# टारझन

[भाग ६ वा]

: मूळ लेखक :

इड्गार राईस बरोज्

: अनुवादक :

कृष्णाकुमारी शेरतुकडे

M. A., B. T.

अनुक्रम 38028
विभाग आ.वी.
329.८
नों. दि. १०।७।६५

IRBK-0111397

रुपये

भारतीय प्रकाशन मंदीर, मुंबई ४.

प्रकाशक :
मोहन शंकर कुलकर्णी,
भारतीय प्रकाशन मंदीर
गिरगांव, मुंबई ४.

मुखपृष्ठ व सजावट :
चित्रकार र. स. कंटक

जानेवारी १९६५

मुद्रक :
चिंतामण वामन जोशी,
माधव प्रिंटिंग प्रेस,
अलिबाग—कुलाबा.

म. ग्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ११३८६ नों. दि ...............
वि. ....क्रा/: ९५.. क्र. ..................

# सप्रेम अर्पण

श्री. विद्याधर नथुराम शेरतुकडे, एम्. ए.

सौ. मीना विद्याधर शेरतुकडे

यांस--

अनुक्रम 3८७२५
विभाग आ. बा.
क्रमांक ३२५८
नों. दि. १०.८.७५

# एक

## (ॲटमेन) बुटकी माणसे

**ऑफ्रिकेतल्या** त्या सुंदर विस्तीर्ण बंगल्यातून तीन माणसे पायऱ्या उतरत होती व नंतर ती फुलाने आच्छादित अशा पथावर आली. वळणावळणाने जाणारा हा रस्ता एका मोठ्या प्रवेशद्वाराला येऊन मिळाला होता. फुलांच्या सुवासाने वातावरण दरवळून गेल्याने सौंदर्य आणि कलाहि जणू हातात हात घालून मिरवत होती.

या तीन माणसांपैकी एक सुंदर स्त्री तरुण अशी आणि दोन पुरुषात एक तरुण आणि दुसरा प्रौढ असा होता.

'बाबा, आज जर आई येथे असती तर असले धाडस करायला कुणीच धजला नसता.'

तो तरुण रागानें म्हणाला, 'ती इथे नाही म्हणूनच मी ही जिवाची मौज करतोय !'

पण बाबा, असे धाडस करणे बरे नाही. वयाबरोबर शरीर व स्नायु ही दुबळे होतात ! ' कोराक म्हणाला.

'पण कोराक, तूं चुकतोस. मला हा नियम लागू नाही. मी रानात जन्मलेला, रानात वाढलेला असा एक सामान्य माणूस आहे !'

'पण पपा, माझे पति म्हणतात ते खरे आहे. वयाबरोबर शक्ति कमी होते !' मेरियम म्हणाली.

'टारझन ऑफ दि अेप'ने अजून कुणाचे ऐकले होते तर तो आता सुनेचे आणि लेकाचे ऐकणार? त्याने सारे हसण्यावारी नेले आणि त्याने आपल्या छोट्या वझिरीला विमानाचे तोंड वळविण्यास सांगितले.

टारझनचे वझिरी अगदी तयारीचे होते. चार पाच जण तर साध्या हवेतच काय पण वादळी हवेतही जहाज चालवत. विमान चालविण्याची कला मात्र कुणालाच येत नव्हती, कारण टारझनने ती कला त्यांना शिकवलीच नव्हती.

'पपा कुणाला तरी बरोबर घेऊन जा.- मशीन बिघडले तर एकटे काय कराल? कुणाची तरी मदत लागेल !'

पण टारझनने त्यांचे न ऐकता फेरफटका मारून येतो असे सांगून विमान चालू केले, जमिनीवरून गिरक्या घेता घेता विमान उंच उडाले आणि दिसनासे झाले.

कोराक एक उसासा टाकून मेरियमला म्हणाला, 'आता हे कदाचित लंडनला जाऊन आईला भेटून येतील.'

'छे! ते शक्य नाही. ते दुसरीकडेच जातील, पहालच तुम्ही!'

आणि अगदी तसेच झाले, टारझनचे विमान उडत उडत एका अनोळखी प्रदेशात येताच तो चकित झाला.

'कुठला हा प्रदेश? या प्रदेशाची कुठल्याच आदिवासीने मला कल्पना दिली नाही! मी आता निदान शंभर मैलावर आलो आहे. हा प्रदेश जसा सुंदर तसाच भयानक, काटेरी व चिंचोळा दिसत आहे.' टारझन विमानातून खाली पहात असताना त्याला युगोगो नदीचे वळणावळणांचे असे पात्र दिसले. त्याने बेत केला की थोडे खाली येऊन निरिक्षण करावे व मग घरी परतावे.

....

पण घडले वेगळेच, ते विमान नकळत खाली येता येता, त्याचा दांडा निसटून ते एका मोठ्या झाडाच्या शेंड्यावर आपटले. खड्खड् आवाज होऊन झाडांच्या गर्दीतच ते पडले आणि सर्व शांत झाले.

त्याला त्याचे घर दुरावले होते. इकडे चिंतामग्न असलेली त्याची सून व मुलगा खेळत होतीं. दुपारचे बारा एक वाजले तरी टारझन–लॉर्ड ग्रेस्टोकचा पत्ता नव्हता. पण कसेही असले तरी हा जंगलचा राजा संकटात सांपडेल असे मात्र कुणालाही वाटले नाही.

●●●

# दो न

**विमान** कोसळताच टारझन बेशुद्धावस्थेत तोंडावर, पालथा असा पडला आणि त्याचवेळी सुमारे अर्ध्या मैलाच्या अंतरावरून एक केसाळ प्राणी इकडे तिकडे नजर फेकीत पुढे येत होता. ही केसाळ व्यक्ति सहा फूट उंच व गोरटेल्या वर्णाची होती. पसरट नाक, ओबडधोबड तोंड, अरुंद कपाळ, पुढे आलेले लांब कान, हत्तीप्रमाणे व खांद्यावर लोंबणारे. हातपायाखेरीज कोण-त्याही भागावर माणसाप्रमाणें केस नव्हते.

कमरेला गुंडाळलेले कातडे व त्याला जोडून कातड्याच्या लांबलांब पट्टयांच्या टोकाला गोल दगड, दगडांना सुंदर रंगाची पिसे त्यामुळें ढोपरापर्यंत लोळणारा तो एक सुंदर झगा झाला होता.

ही एक बाई होती. चौफेर नजर फिरवून, शत्रूचा अंदाज घेतघेत ती पुढे चालली होती. तोच तिच्या नाकाला कसला तरी वेगळाच वास आला, पण ती न घाबरता त्या अनुरोधाने चालू लागली व थोड्याच वेळांत बेशुद्ध टारझनजवळ आली

'कोण हा? आपल्यासारखा तर दिसत नाही!'

तिने त्याच्यावर शस्त्र उगारले, पण लगेच ते मागे घेऊन त्याच्या जवळ येऊन बसली, त्याला उताणा करून त्याच्या छातीस कान लावला,



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

—त्याचवेळीं सुमारे अर्ध्या मैलाच्या अंतरावरून एक केसाळ प्राणी इकडे तिकडे नजर फिरवीत येत होता.

पण आवाज ऐकू येईना. तेव्हां त्याचे कपडे चाचपून बटण.च्या बाजूने त्याचा शर्ट फाडला व छातीला कान लावताच ऐकू आले काहीतरी. ती काहीतरी विचार करून टारझनला खांद्यावर टाकून निघाली. त्याला खांद्यावर घेणे म्हणजे काय चेष्टा? पण तिचे बळच अचाट!

मग ती हळूहळू वळणदार अशा रस्त्याने अर्ध्या तासात एका घळीजवळ आली. ती घळ फार अरुंद होती. आजूबाजूने दाट झाडी असूनही ती सराईताप्रमाणे चालत होती. शेवटी ती एका लांब, अंधारी व वळणदार मार्ग असलेल्या गुहेशी आली, सुमारे अर्ध्या मैलाचे अंतर काटून एका ॲम्पिथिएटरसारख्या विभागात आली. ही जागा गवताळ व सपाट होती. दोहो बाजूला दगडी भिंतींचे कडे आणि तेथे तिच्याच सारखी माणसे होती. त्यांना डावलून भिंतीजवळ असलेल्या बोगद्यासारख्या, अरुंद तोंडाच्या घळीजवळ आली. त्यांची तोंडे दगडी शिळांनी बंद केली होती. त्या जागेत झोपडीवजा घरें व माणसांची वस्ती होती.

ती बाई जेव्हा त्या आवारांत शिरली, तेव्हा सारे आश्चर्यभूतपणे पाहू लागले. पण कुणालाही तिच्यापुढे जाण्याचे धाडस झाले नाही, पण तिच्यासारखी अवजड अशी एक बाई तिच्याजवळ येऊन खुणांनी डोळे वटारून तिला थांबविण्याचा प्रयत्न करू लागली. त्या पहिल्या स्त्रीने टारझनला जमिनीवर फेकले व काय होते हे पाहण्यापूर्वीच दुसऱ्या स्त्रीने तिच्या डोक्यात सोटा मारला व ती बेशुद्ध पडली. नंतर तिने त्याला घळीजवळ नेऊन ठेवले. त्याचे कपडे काढावेसे वाटून तिने लगेच त्याचे कपडे काढले, त्याबरोबर त्याच्या गळ्यांतील, त्याच्या आईची सोन्याच्या सांखळीतील रत्नजडीत अशी बांगडी तिला दिसली, पण तिने ती तशीच राहू देऊन त्याचे अवजड बूट काढले.

नंतर त्याचा बेशुद्ध देह उचलून कसातरी त्या घळीत कोंबला आणि

तीन टाळ्या वाजविताक्षणीच सात मुले तिच्या भोवती जमली. ही मुले-मुली एक ते सतरा वर्षापर्यंतची होती. पशूप्रमाणेच ही मुले स्वतःची काळजी घेऊ शकनात. अगदी एक वर्षाचे मुलसुद्धां. त्या मुलांना तिने खूण करताच, म्हणजे प्रथम डोके हलवून, नंतर छातीवर हात ठेवून आणि छाती जोराने दाबून मान हलवली आणि जरा बाजूला सरताच तिला आढळले की जिला आपण सोट्याने मारले ती शुद्धीवर येत आहे. ती बाई उठली व तिच्याकडे रोखून पाहून आपल्या घरट्याच्या दाराशी आली, तोंच तिला व सर्वांना कसला तरी वास येतांच सर्व जण हुंगू लागले, व थोड्याच वेळांत एक व्यक्ति समोर दिसताच सर्व चकित झाले, ही स्त्री पहिलीपेक्षां अवजड व लांब रुंद अशी होती. तिच्या एका खांद्यावर एक मेलेला काळविट व दुसऱ्या खांद्यावर ना धड पशू ना धड माणूस असा एक प्राणी होता, तो अर्धवट बेशुद्धावस्थेत पण विव्हळत होता.

त्यांना नांव, भाषा, काहीच नव्हते, त्यांना हसताही येत नव्हते सर्व कारभार खुणांनी, पण या खुणा अगदी समजतील अशा. पण आवाज नाहीच, तेव्हां त्यांना आपण नंबर देवूं.

टारझनला विमान कोसळलेल्या जागेवरून आणले ती नंबर एकची स्त्री, जिला नंबर एकने सोटा मारून बेशुद्ध केले ती नंबर दोन आणि नंबर तीन म्हणजे जिने काळवीट व जिवंत प्राणी आपल्या खांद्यावरून आणला ती.

आतां नंबर एक व दोन एक झाल्या, कारण त्यांना नंबर तीनवर हल्ला करून त्या शिकारी पळवायच्या होत्या. त्या एकजुटीने तिच्या अंगावर धांवल्या पण तीही बेसावध नव्हती. तिने आपली शिकार पायाशी टाकली व चतुरतेने व चपळाईने नंबर एकच्या डोक्यात सोटा मारतांच तिची कवटी फुटून ती यमसदनास गेली. तिचा काटा काढ-

तांच नंबर तीन नंबर दोनकडे पाहू लागली पण त्या आधीच संधी साधून तिने आपल्या घराकडे पळ काढला.

पण त्याचवेळी चमत्कार घडला. नंबर तीनने जो दुसरा प्राणी आणला होता तो मनुष्य होता. त्या स्त्रिया लढत असता तो सावध होऊन पळण्याच्या मार्गावर असता त्याने अचूक वेळ साधून गुहेच्या दाराकडे धाव घेतली. हा प्राणी आकाराने, उंचीने, वजनाने हलका असला तरी धावण्यात त्या स्त्रीपेक्षा चपळ होता. त्याचे पाय लांब होते. तो पुरुष होता. नंबर तीनचा पाठलाग सुरू होतांच एव्हांना तो अॅम्फिथियेटर सोडून दरीच्या मार्गाला लागला. पण त्या स्त्रीला आपल्या झग्यामुळे चालता येत नव्हते. तिने एक युक्ति केली. झगा सोडून त्याच्या चामड्याच्या पट्टयाचा गोफणीप्रमाणे उपयोग करून टोकाचे दगड वापरले व गोफणीप्रमाणे मारा त्या दिशेस सुरू केला. पट्टीने व वादीने अचूक काम करतांच त्या माणसाला डोक्याच्या बाजूस हाडावर लागले आणि तो बेशुद्ध पडला.

नंबर तीनची पाठ फिरताच नंबर दोनने तिचा काळवीट पळविला होता. आणि ती खाण्याच्या तयारीत होती. पण नंबर तीनने आपल्या सोट्याचा फटका मारून तिला ठार केले. तिथे उभे असलेल्या अनेक स्त्रियांना तिने आव्हान दिले. 'या ! आणखी कुणाला यायचे त्यांनी या काळवीट खायला ! ' पण त्या राक्षसिणीपुढे कोण धजणार ?

नंतर तिने ते दोन्ही प्राणी खांद्यावर टाकून ती घराकडे गेली. तिथे जातांच ती प्रेते निर्दयपणे खाली टाकली व बिस्तरावर काळविटाचे मांस भाजून खाऊ लागली. याचवेळी तो पुरुष पुन्हा शुद्धीवर आल होता. ती काही न करता नुसती त्याच्याकडे पाहूं लागली. त्याने काळवीट खाण्याची इच्छा प्रदर्शित करताच तिने मोठ्या खुषीने परवानगी दिली. त्याला मांस तोडायला आपला सुरापण दिला. आणि

तो ते मास खाऊ लागताच नवलाने ती त्याच्याकडे पाहू लागली. तो कुरुपच होता. पण तिच्या दृष्टीला तो तेंव्हा सुंदर वाटला. पाहता पाहता त्याच्या हातापायात तिला धातूचे वाळे आढळले आणि गळ्यांत दातांच्या व हाडांच्या माळा दिसल्या. केस डोक्यावर गुंडाळून लांकडी आकड्यांनी बसविले होते. त्याचे खाणे होताच ती त्याचा अंबाडा धरून त्याला गुहेकडे फरफटत नेऊ लागली. तो तिला ओरबाडू लागला. नंतर त्या ॲम्पिथिएटरमध्यें काही गिधाडे जमली. आणि नंबर एक व दोनचे मास टोचून टोचून खाऊ लागली.

●●●

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 38025
विभाग बा.वा.
क्रमांक 3294
नों. दि. 7010184
ग्रंथालय शाखा.

तांच नंबर तीन नंबर दोनकडे पाहू लागली पण त्या आधीच संधी साधून तिने आपल्या घराकडे पळ काढला.

पण त्याचवेळी चमत्कार घडला. नंबर तीनने जो दुसरा प्राणी आणला होता तो मनुष्य होता. त्या स्त्रिया लढत असता तो सावध होऊन पळण्याच्या मार्गावर असता त्याने अचूक वेळ साधून गुहेच्या दाराकडे धाव घेतली. हा प्राणी आकाराने, उंचीने, वजनाने हलका असला तरी धावण्यात त्या स्त्रीपेक्षा चपळ होता. त्याचे पाय लांब होते. तो पुरुष होता. नंबर तीनचा पाठलाग सुरू होतांच एव्हांना तो अँम्फिथियेटर सोडून दरीच्या मार्गाला लागला. पण त्या स्त्रीला आपल्या झग्यामुळे चालता येत नव्हते. तिने एक युक्ति केली. झगा सोडून त्याच्या चामड्याच्या पट्टयाचा गोफणीप्रमाणे उपयोग करून टोकाचे दगड वापरले व गोफणीप्रमाणे मारा त्या दिशेस सुरू केला. पट्टीने व वादीने अचूक काम करतांच त्या माणसाला डोक्याच्या बाजूस हाडावर लागले आणि तो बेशुद्ध पडला.

नंबर तीनची पाठ फिरताच नंबर दोनने तिचा काळवीट पळविला होता. आणि ती खाण्याच्या तयारीत होती. पण नंबर तीनने आपल्या सोट्याचा फटका मारून तिला ठार केले. तिथे उभे असलेल्या अनेक स्त्रियांना तिने आव्हान दिले. 'या ! आणखी कुणाला यायचे त्यांनी या काळवीट खायला ! ' पण त्या राक्षसिणीपुढे कोण धजणार ?

नंतर तिने ते दोन्ही प्राणी खांद्यावर टाकून ती घाराकडे गेली. तिथे जातांच ती प्रेते निर्दयपणे खाली टाकली व विस्तवावर काळविटाचे मांस भाजून खाऊ लागली. याचवेळी तो पुरुष पुन्हा शुद्धीवर आला होता. ती काही न करता नुसती त्याच्याकडे पाहूं लागली. त्याने काळवीट खाण्याची इच्छा प्रदर्शित करताच तिने मोठ्या खुषीने परवानगी दिली. त्याला मांस तोडायला आपला सुरापण दिला. आणि

तो ते मास खाऊ लागताच नवलाने ती त्याच्याकडे पाहू लागली. तो कुरुपच होता. पण तिच्या दृष्टीला तो तेव्हा सुंदर वाटला. पाहता पाहता त्याच्या हातापायात तिला धातूचे वाळे आढळले आणि गळ्यांत दातांच्या व हाडांच्या माळा दिसल्या. केस डोक्यावर गुंडाळून लांकडी आकड्यांनी बसविले होते. त्याचे खाणे होताच ती त्याचा अंबाडा धरून त्याला गुहेकडे फरफटत नेऊ लागली. तो तिला ओरबाडू लागला. नंतर त्या ॲम्पिथिएटरमध्यें काही गिधाडे जमली. आणि नंबर एक व दोनचे मास टोचून टोचून खाऊ लागली.

●●●

संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 38025
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा.

# ती न

काही वेळाने टारझनला ठेवलेल्या ठिकाणी ती मुले गेली व नवलाने पाहू लागली. त्यांच्या समजुतीप्रमाणे तो त्यांच्या जातीचा नव्हता.

बेशुद्धावस्थेतही ती मुले टारझनला वरखाली करीत, टिचक्या, टपल्या, चिमट्यांचा मारा करीत. एकाने तर त्याच्या गळ्यातील सांखळी आपल्या गळ्यांत घातली. मग ती मुले कंटाळून निघून गेली व नंतर टारझन सावध झाला.

त्याने इकडे तिकडे पाहिले, पण आपण कुठे आहो हे त्याला कळेना. काही वेळाने त्याला एक एक आठवू लागले. विमान चालविताना खाली पाहिल्याने दुर्लक्ष होऊन ते वृक्षावर कोसळले व टारझनही कोसळला. त्यामुळे त्याला काही आठवेनासे झाले.

मग तो बसल्या बसल्या त्या मुलांकडे निरखून पाहू लागला. हे मानव खरे, पण कोणत्या जातीचे आणि इथे काय करतात ? आणि नवल म्हणजे मोठी माणसे कुणीच नाहीत, असे का ? याचा तो विचार करू लागला.

मग तो भगदाडांतून बाहेर येऊन इकडे तिकडे फिरू लागला, तरी लहान मुलांचे लक्ष इतर उद्योगात असल्याने तीं दुर्लक्ष करीत होती त्याच्याकडे.

धोका पोहचण्यापूर्वी इथून निसटण्याचा विचार टारझनने केला. तो जाण्यासाठीं भिंतीवर वरखाली नजर फिरवून पाहात असता त्याला एक माणूस शिरेल एवढे भोक दिसले, ते गाठण्याचा विचार आला पण दिवस असल्याने धोका होईल या भीतिने तो थांबला.

संध्याकाळच्या सुमारास तो त्या मुलांशी बोलण्याचा प्रयत्न करू लागला. त्याने अनेक भाषा वापरल्या, पण भाषा राहोच, पण त्यांच्या गळ्यांतून शब्दहि निघेना मग तो करचाक वानरांच्या भाषेत बोलला, पण व्यर्थ ! त्यामुळे तो नाद सोडून देऊन तो गप्प बसला.

मुलें चळवळ करू लागताच दोन मोठ्या मुली गुहेच्या शिळेचे तोंड बंद करण्यासाठी त्यावर सोट्याने टोके मारू लागल्या. मुलांनी पायांनी लाथा मारूनही शिळा निघेना. त्यांच्या चेहऱ्यावरून टारझनला वाटले की ह्याना भूक लागली असेल, खायला मागण्याचा प्रयत्न करत असतील, पण त्या मुलाना काय ठाऊक की त्यांची आई म्हणजे नं. एकची स्त्री बाहेर मरून पडली आहे.

नंतर त्या मोठ्या मुलीने आपल्या विशिष्ट पद्धतीने सोटा आपटून सुचवले की आपण या माणसाला खाऊ, पण हे मनुष्यभक्षक नव्हते. त्यांचे रीतिरिवाज अगदी विचित्र होते. त्यांच्या राज्यांत पुरुषांना जागा नव्हती. स्त्रिया तारुण्यांत येत तेव्हा निसर्गाच्या नियमाप्रमाणे कुठला तरी पुरुष आपला सहचर म्हणून आणीत व जसा पुरुष स्त्रीवर अत्याचार करतो तसा त्याच्यावर करून गर्भ राहिला की त्याला पुन्हा हद्दीबाहेर हाकलून देत. माया, आपुलकी, प्रेम ह्या भावनाच त्यांना नव्हत्या. तसेंच त्यांचे मुलगे चौदापंधरा वर्षांचे झाले की त्याना पण हाकलून देत. मग ते प्रौढ किंवा तरुण झाले की पुन्हा वंशासाठी सहचर म्हणून त्यांना आणीत. कधी कधी तो भाऊ आहे की परका आहे हेही समजत नसे, कधी कधी पुरुषासाठी स्त्रियांच्यात आपापसात भांडणे होत व जी

बलवान तिचाच विजय होई.पण त्यामध्ये त्या पुरुषाचे हाल करीत. त्यांच्या मते पुरुष म्हणजे दुबळे, पुरुषांना हद्दपार केल्याने कष्टाची सारी कामे स्त्रियाच करीत त्यामुळे त्यांचे स्नायु पुरुषांपेक्षां बलवान होते. दुसरी गोष्ट म्हणजे पुरुषांना बाहेर जाण्याचे काम दिले की ते पळून जात. त्यांच्या राज्यात जन्मलेले पुरुष खुषीने हद्दीबाहेर होत; कारण दुसऱ्या तरुणी त्यांना सतावीत. आपल्या सहचऱ्यांबद्दल त्यांना प्रेम नसे. अलाली जातीच्या स्त्रिया ह्या अशा असत. त्या फक्त वंशासाठी सहचर आणीत.

आता त्या मुलांच्या भुकेचे साधन टारझन होते. त्या मुलीनी त्याला मारायचे ठरवले व मुलांनी मास भाजून खायचे ठरवले, आणि त्यासाठी विस्तव पेटविला.

दोन मुलींतील विशेषतः मोठी मुलगी टारझनवर सोटा उगारून धावली पण मध्ये तिचा भाऊ आडवा आला, त्याने तिला असे न करण्याबद्दल सुचवले पण ती ऐकेना. तो टारझनच्या बाजूला गेला. आता तो आपणास शिक्षा देईल की आश्रय या विचाराने पाहिले. पण टारझनला हसत हसत त्याच्या पाठीवरून हात फिरविला आणि त्याला बरे वाटले.

ती मुलगी अधिकच संतापून सोटा घेऊन टारझनच्या अंगावर धावून आली. टारझनला काय करावे हे कळेना! स्वसंरक्षणार्थ खरे पण बाईच्या अंगावर हात टाकायचा? त्याची नागरी संस्कृति त्याला तसे करू देईना. पण आता तो माणूस नव्हता, पशू होता. त्याच्यात करचाकाची पशुवृत्ति जागी झाली व वेळ पडल्यास तिचा प्रतिकार करण्याचे त्याने ठरविले.

इतक्यांत नंबर तीनच्या स्त्रीला, नंबर एकच्या गुहेतून भांडणाचा आवाज ऐकू आला. कारण काय असावे? कारण नंबर एक दुपारीच मेली

होती म्हणून ती प्रेमासाठी, दयेसाठी नव्हे तर केवळ आपली जात वांचावी म्हणून त्यांना कांहीतरी सांगण्यास जाऊ लागली.

शिळेवर सोट्याचा आवाज करून ती सरकवली. त्यामुळे मुले दचकली व टारझनने मागे वळून पाहिले. तो दारात महिषासुरमर्दिनी उभी दिसली. तिने त्याला पाहिले व त्यानेही ते प्रचंड धूड पाहिले. त्याला, एक कल्पना सुचली. बरेच वर्षांत आपले बळ अजमावून पाहण्याची संवय सुटली होती. आपण तर अगदी निःशस्त्र! मग हिला कशी डावलायची? आणि ती विचार करीत होती की याला आपल्या गुहेत कसे घ्यायचे? याला मारणे म्हणजे मूर्खपणा.

नंबर तीनसह सारी मुले कोंपऱ्यात उभी होती. टारझन काय होतंय हे कळण्यापूर्वीच एक मुलगा ॲम्फिथियेटरमध्ये खारीच्या चपळाईने आला. त्याने ही जागा पूर्वी पाहिली नव्हती, कारण नंबर एकने आणले तेव्हा तो बेशुद्ध होता.

त्या मुलाला तो मार्ग ठाऊक असल्याने चपळाईने टारझनच्या पुढे निघाला. धावताना त्याला अनेक बायकांनी पाहिले व त्याला पकडण्यासाठी धावू लागल्या. धावतां धावतां अलालस म्हणजे तो मुलगा व टारझन दोघे एका दरीत आले. आता टारझन मागे पडला, कारण त्याची धावण्याची संवय मोडली होती.

सूर्यास्तानंतर वाट दिसेना व पुढचे माणूसही दिसेना. तेव्हा त्या स्त्रियांनी कमरेचे दगड गोफणीमधून मारण्यास सुरवात केली. पण अचूक कसे लागणार? ते दगड त्या दोघांना न लागता बाजूने जात. शेवटी तो मुलगा पुढून व टारझन त्याच्यावर लक्ष ठेवीत झाडाझाडातून चालू लागला, कारण तो वनराज होता.

आणि आपले काही चालत नाही हे पाहून त्या स्त्रिया परतल्या. सर्वत्र शांत झाले. काळोख मी म्हणत होता. रक्षणकर्त्याला साद

घालावी तर त्या जातीला आवाजच नव्हता. रानांतला एकही पशू पाहिला नसल्याने तो भीत होता. त्याची आई असती तर त्याला एक दोन वर्षं गुहेतून बाहेर पडण्याचा प्रसंगच आला नसता. रात्रीच्या वेळी रानांत भयंकर प्रसंग आज त्यावर आला होता.

पण इतक्यांत कसलातरी आवाज झाला. वरून फांद्याफांद्यातून टारझन येत होता.

●●●

# चा र

**आणि** त्याचवेळी एक सिंहाने अलालसावर झडप घातली आणि तेथे असलेल्या टारझनने मुलाला अलगद उचलून घेतले. तो सिंह निघून गेला.

सकाळ होताच त्या दोघाना भूक लागली, पण शिकार करायला हवी होती. त्या मुलाला तरी सोडणार कसे? जाताना टारझनने त्या मुलाला तिथून न जाण्याबद्दल खुणावले आणि मग तो झेप घेत घेत एका जागी आला. तेथे हरिणे पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले. त्याच्या अनेक आठवणी जागृत होऊन त्याला हसू आले.

तो हरिणाची वाट पाहात बसला असता मध्येच त्याला सिंहाचा वास आला. आता मात्र कठीण प्रसंग. सिंहाला तो घाबरत होता असे नाही पण हरणाचे मांस त्याला जास्त आवडे आणि सिंहाबरोबर लढणे त्याला आज तरी नको होते. त्याचे मोठे साधन म्हणजे दोरी पण ती यावेळी त्याच्याजवळ नव्हती. तो काही रस्ता ओलांडून गेला. तिथे पांच-सहा काळवीट मैदानांत फिरत होते; पण शिकार कशी करणार? चाहूल लागली की ते पळणार! तेव्हा तो पुन्हा मागे आला व हरणाची वाट पाहात बसला.

ते दुर्दैवी हरण पळता पळता सिंहाच्या तावडीमध्ये सांपडले. पण

तो मूर्ख सिंह त्याला पाहताच गुरगुरला. वाघ, सिंह शिकारीवर गुपचुप उडी टाकतात, पण तो तरुण सिंह मूर्ख होता. हरिण पळाले व टारझनच्या हाती सांपडले. टारझनने निमिषार्धात उडी टाकली व ते पकडून त्याची मान मुरगळली. आणि झाडावर उडी घेऊन जाता जाता दुरून पहात असलेल्या सिंहाला म्हणाला, ' वेड्या अजून तुला शिकार करता येत नाही. तूं तरसाप्रमाणे प्रेतच खा ! '

टारझन झाडावर बसतांच हरणाचे मांस कापायला त्या लालसर मुलाने आपला दगडी सुरा त्याला दिला. टारझनने मांसाचे दोन तुकडे करून दोघांत वाटून घेतले. रक्ताने भरलेलं रसरसीत कच्चे मांस टारझनने खातांना पाहून त्या मुलाला नवल वाटले. हा माणूस कच्चं मांस खातो ? नवलच आहे ! आम्ही असे करीत नाहीं.

काही वेळाने त्या मुलाने आपले मांस विस्तवावर भाजून खाल्लं. त्याला नीट भाजता येत नव्हतं, पण कसंतरी खाल्लं.

× × ×

असे काही दिवस गेले, त्या मुलाचे संगोपन टारझनला करावे लागे. त्याला काहीच येत नसल्याने तो भीतीने टारझनच्या मागे मागे असे, टारझनला तसा त्याचा काहीच उपयोग नव्हता. पण नाइलाज होता. अलिकडेच त्या मुलाला झाडाच्या फांद्यावर निर्भयपणे बसता येऊ लागले, पण त्याला बोलतां येत नसे. अशा सहचऱ्याचा काय उपयोग ?

टारझन त्याची खुणांची भाषा शिकला, त्याने ठरवलं की पहिल्याने आपणांस लागणारी शस्त्रे, धनुष्यबाण, भाला, गवताची दोरी, कपडे, वगैरे तयार करायचे, आणि त्याप्रमाणें तो कामाला लागला. त्याने प्रथम काळविटाच्या चामड्याचे कमरेचे वस्त्र केले, ते करतांना त्या मुलाने ते नीट पाहून घेतले, नंतर तीनच्या स्त्रीने जशी गोफण तयारी

केली होती. टारझनला मारायला, तशीच टारझननेही तयार केली, निदान त्यामुळे लहान प्राणी मारून तरी ते त्याच्या उपयोगास येत.

ती शस्त्रे तयार करताना एक दिवस जमीनीस कान लावतांच तो मुलगा घाबरला व त्याने टारझनला बोलावले, आणि त्याला कळले तीन प्राणी आपल्या दिशेने येत आहेत. सर्व साहित्य झाडाच्या बेचक्यात ठेऊन ते दोघे झाडावर वाट पहात बसले.

थोड्याच वेळात एका मागून एक अशा तीन अलाली स्त्रिया झाडीतून बाहेर आल्या. त्या शोधक नजरेने पाहात पाहात एका मार्गावर आल्या. आणि वळणावर दिसेनाशा झाल्या. तो पर्यंत हे दोघे पुतळ्याप्रमाणे स्थिर बसले होते. त्या गेल्याची खात्री होताच त्यानी पुन्हा खाली उतरून कामास सुरवात केली. पंधरा दिवसात सर्व वस्तू तयार केल्या. नंतर टारझनने त्या मुलाला शिकवायला सुरवात केली. तो मुलगा नेमबाजी, भालाफेक शिकला. नंतर त्याने एक काळवीट मारला. आता दोघेही बरोबरीने शिकार करू लागले. आता तो अलाली स्त्रियांनाही न घाबरता झाडावर स्वस्थ बसत असे, हे पाहून टारझनला एक कल्पना सुचली. आता तो मोठा होताच स्त्रीची गाठली पडली की अगदी धीट पुरुषाप्रमाणें वागेल, त्यांच्या आश्चर्याला सीमा न राहून त्या थक्क होतील !

आणि हे कल्पनारम्य चित्र टारझनला फार आवडले.

# पां च

**आलालस** एकाद्या तरुण कुत्र्याप्रमाणे आता टारझनच्या मागे राहात असे. तो आता बराच हुषार झाला होता. तो हरणाला · मारण्याचा बेत करीत असता एक अलालस स्त्री त्याला दिसली.

त्याच्या मनांत तिला जाऊं द्यावी की नाही हा विचार येतो न येतो तोच त्याच्यातील पशु जागा झाला. पण इतक्यात त्याला कसलातरी माणसाचा वास आला. पण हा वास इतका मंद व निराळा का? आणि तो वाट पहात राहिला. ती स्त्री विशिष्ट नजरेने एका दिशेकडे पहात असता, एका झाडीतून बाहुलीसारखी माणसे येताना दिसली. तीं घोड्यावर स्वार झाली होती, व गोरी होती. विश्वास न बसून त्यानी निरखून पहातांच त्याला आढळले की त्याच्या अंगांत वीरासारखे कपडे आहेत व त्यांच्या हातात तलवारी व भाले आहेत. ते घोडेस्वार आहेत पण ते घोडे नव्हते. तर गोजिरवाणी, मऊमऊ अंगाची काळवीटे होती. ती फार सुंदर व चपळ होती व हे लोक सुद्धा अतिशय चपळ व शूर होते. टारझन त्यांची गंमत पहात मग्न असता त्या अलाली स्त्रीच्या ते दृष्टीस पडले. आता काय होणार? ह्या कल्पनेने एवढीशी मुंग्यासारखी ती माणसे आणि ही विद्रुप राक्ष-

सीण यांचा सामना कसा होणार? पण ती पुढे येताच ते पण पुढे सरले. भय त्याना ठाऊक नाही असे दिसले. पण त्या राक्षसिणीच्या दंड्यापुढे त्याचे काय चालणार? पहिल्याच फटक्यात तिने काही जणाना मारले. ते सुमारे शंभर असावे असे वाटले. आता अगदी थोडे राहिले होते. त्यांची इतकी माणसे मेली तरी ते मागे सरत नव्हते. माघार घेत नव्हते. याचे कारण आता टारझनला कळले होते. त्या अलाली राक्षसिणीच्या हातांत एक वीर सापडला होता. तिने एक मूठ आवळली असती तर तो मेला असता. पण तिने तसे का केले नाही हे टारझनला समजलेच नाही. आणि टारझनला आता कळले की ते त्याच्या संरक्षणाकरिता थांबले आहेत. ते प्राण देऊन जोराचा प्रतिकार करीत होते पण काही जमत नव्हते.

टारझन एकदम पुढे झाला. त्याला पाहताच ती स्त्री आणि छोटे वीर सगळे चकित झाले. हा एवढा मोठा माणूस आपला शत्रू की मित्र? त्या स्त्रीने मनाशी काही तरी निश्चय केला. तिने ठरविले की ह्याला घेऊन जायचे व तिने जवळ येण्याची त्याला खूण केली. पण टारझनच तो! त्यानी तिला उलट खूण केली. त्याला खुणांची भाषा येत असल्यामुळे त्याने असे सुचवलं की 'त्या माणसाला सोड.' पण तिने त्याला न जुमानता अधिकच पुढे आली. टारझनने भाला उगारून तिला इशारा दिला. ती जरा घाबरली पण ऐकेना. असा पुरुष तिने कधीच पाहिला नव्हता.

आता हे प्रकरण हातघाईवर येईल असे वाटून त्याने तिच्या छातीवर अचूक भाला मारला. ती खाली कोसळली. तो माणूस तिच्या हातांतून सुटला. इतर माणसे धावली व त्याच्या भोवती गोळा झाली. कुणी त्याची चुंबने घेऊ लागले. कोणी त्याला खांद्यावर घेऊन नाचू लागले. टारझनला वाटले की हा कोणी त्यांचा वरिष्ठ किंवा राजा असेल



—राक्षसिणीच्या हातांत एक वीर सांपडला होता. तिनें मूठ आंवळली असती तर तो मेला असता !

त्यांचे ते स्वागत संपताच त्या वीराने त्यांच्यासमोर भाषण केले. त्याचा अर्थ टारझनला समजला नाही. पण सारांश समजला. तो त्यांच्याकडे आणि अधून मधून टारझनकडे पहात होता. म्हणून त्याला वाटले की हे भाषण त्याच्याविषयी त्या वीरांच्या आदराचं असेल. त्याचा आवाज गोड होता. टारझनला वाटले ह्याचा आपल्यावर विश्वास बसण्यासाठी आपण काय करावे? त्याला एकदम एक विचार सुचून सर्व शस्त्र टाकून देऊन तो पुढे आला आणि त्याने आपला हात उभारून आपला पंजा त्याच्यापुढे केला.

ही मित्रत्वाची खुण समजतांच तो अँट-वीर पुढे झाला आणि शस्त्र सावरून त्यानी हात पुढे केला. टारझनने आपला गुडघा टेकून आपला हात त्याच्या हातात देऊन मान झुकवली. त्यानेही तशीच मान झुकवली. मान वाकवणे म्हणजे एकमेकाबद्दल आदर दर्शविणे होय. मग बाकीच्या वीरानीहि आपल्या पुढाऱ्याच्या सांगण्यावरून टारझनला अभिवादन केले. पुढारी तरुण व उमदा होता. त्यांच्यात कोणीच वृद्ध असे नव्हते. तो त्यांचा नायक होता. इतर अधिकारीसुद्धा त्याच्याप्रमाणे तरुण व गोरे होते. पण उन्हाने काळवंडल्यामुळे ते पिंगट दिसत होते. त्यांचे नाक डोळे पण सुंदर होते. जणू काय ते म्हणजे टारझनची एक छोटी प्रतिकृतिच होती.

त्यांचं निरीक्षण करताना, तरवारीबरोबर डाव्या हातात भालाही असल्याचे त्याना आढळले. उजव्या बाजूला कमरेवर एक दुधारी चाकूही आढळला. नंतर त्या अधिकाऱ्याने खूण करताच ते अधिकारी जखमी योद्धयाची तपासणी करू लागले. वीस मेले होते व काही जखमी होते. पण ज्यांची जगण्याची आशा नव्हती, त्याना त्यांनी तलवार खुपसून ठार केले.

सैनिकी कायदा! त्यावेळी टारझनला खूप वाईट वाटले. शिस्त

म्हणजे शिस्त असा त्यांचा बाणा असावा. नंतर त्यानी पन्नास इंच लांब आणि नऊ इंच खोल व आठ इंच रुंद असा खड्डा खणला व प्रेते दुहेरी त्यामधे ठेवून त्यावर माती लोटली आणि मग लहान लहान दगडा गोट्यांनी तो खड्डा आच्छादून टाकला. नंतर वरिष्ठांच्या हुकुमाप्रमाणे ते जखमी लोकांकडे वळले. त्यांनी रिकाम्या काळविटांना (त्यांच्या घोड्यावर) त्यांना बांधले. सगळ्या काळविटांना एका रांगेत उभे केले व नायकासह ते सर्व तयार झाले

टारझन हे एकाग्रतेने पहात होता. सगळे शिस्तबद्ध पाहून त्याला आश्चर्य वाटले.

नंतर उरलेल्या लोकांना काही तरी सांगितले आणि त्यांच्याबरोबर आपल्या निवासस्तानाकडे येण्याची टारझनला विनंती केली. त्यांच्या-कडून सगळे समजावून घ्यायचे म्हणून टारझनसुद्धा जाण्यास तयार झाला. पण त्याला त्या अलालस मुलाची आठवण झाली. तो शिकारीला गेला. तो एकटा काय करील?

पण त्याच्याबरोबर जाण्याची संधी आपण घालवायची नाही असे त्याने ठरवले. तो मुलगा हुशार झाला असून त्याच्याकडे हत्यारेसुद्धा आहेत. ती कशी चालवायची हे सुद्धा त्याला समजते. आपण परत आल्यावर त्याला पाहूच.

टारझनचे लक्ष त्या निघालेल्या त्या तुकडीकडे गेले. ते बरेच दूर गेले होते. जखमी वीर पाठीवर घेऊनही ते वाऱ्यासारखे पळत होते, जणू काय हवेतून माळच्या माळच सरकत होती. त्यांच्या शिस्तबद्ध चालीचं टारझनला कौतुक वाटलं, त्यांच्यात बरीच प्रगती टारझनला दिसली. टारझन जरी एका प्रगत राष्ट्राचा एक सन्मान्य नागरिक होता, तरी ह्यांच्या प्रगतीचे त्याला कौतुक वाटले.

पण हे इतके लहान कसे? फक्त अठरा इंच, कमी पण जास्त नव्हे! जगातले कितवे आश्चर्य?

नंतर त्यांच्या म्होरक्याने टारझनला खूण केली, 'चला!'

ते सर्व घोडेस्वार होते, पण टारझन पायींच चालत होता. मात्र जलद चालत होता. मधून मधून तो मागे पडत होता, कारण काळविटांची तो बरोबरी कशी करणार? इतक्यांत छोट्या रानाकडे येता येता त्यांना कसला तरी वास आल्याने, त्यांच्या नायकाने खूण करताच ते गडद झुडुपांत आले. वासामुळे शत्रूची चाहूल त्यांना लागली. सर्वांनी एका बाजूने तलवारी सरसावून झाडीला वेढा दिला, आणि एक धिप्पाड मांजर (ऑफ्रिकन कॅट) नायकावर हल्ला करण्याच्या हेतूने आले. त्या बुटक्या लोकांच्या मानाने ते वाघा प्रमाणे होते. त्या मांजराने उडी घेतांच त्यानी तलवारीने ठार केले व विजयाने पुढे निघाले.

टारझनला त्यांचे कौतुक वाटले.

टारझनला खूप भूक लागली होती. समोर दिसणाऱ्या एका हरिणांच्या कळपांतील एक हरिण मारून, रक्ताने भरलेले रसरशीत मांस कच्चच त्याने खाल्ले. ते पाहून बुटके लोक चकित झाले, पण त्यांना त्याच्याविषयी घृणा वाटली. नंतर त्याने खावून उरलेले कातड्यांत बांधून व बाकीचा भाग टाकून देण्यापूर्वी त्या लोकांना देण्यासाठी पुढे केला, पण त्यानी ते नाकारले. त्याना वाटले की आपण कच्चे मास खात नाही आणि हा खातो. आता त्यांना त्याच्याविषयी घृणा व भीतिहि वाटू लागली, पण त्याला बरोबर घ्यायचे होते. ते पुढे निघाले.

टारझनला आता जोर आला होता, आणखी थोडे चालल्यावर त्यांना काही टेकाडे दिसली, त्याला अधूनमधून उंचवटे होते. त्यातून एक टोळी येत होती, टारझन उंच असल्याने त्याला ती दिसली, पण ह्यांना दिसेना, त्याने त्यांच्या म्होरक्याला वर उचलून घेऊन ती दाखविली,

तो म्होरक्या वर उचलतांच खूप घाबरला, पण त्याला परत घोड्यावर ठेवतांच त्याच्या जिवांत जीव आला.

नंतर दोन्ही टोळ्या समोरासमोर आल्या. दुसऱ्या टोळीचा नायक म्हणजे टारझनने सकाळी वाचवलेला नेता, आणि तो टारझनच्या स्वागतासाठी आला होता.

नंतर या टोळीच्या म्होरक्याने रस्त्यांत घडलेली हकीकत सांगताच, व त्याचा आपणांस धोका आहे असे सांगताच दुसऱ्या टोळीचा म्होरक्या म्हणाला, 'सकाळीच त्याने मला वाचवले. आज तुम्ही सगळे त्याच्या हातात असूनही धक्का लावला नाहीं, मग हरिण खाल्ले तर त्यात काय बिघडले?' त्याने तक्रार का केली हे टारझनला समजले नाही.

नंतर तो सुंदर रस्ते असलेल्या एका खेड्यांत आला, लांबून दिसणारी टेकाडे व दगडी घरे त्यांनीच बांधलेली होती, आणि ती कामे त्यांच्या कामगारांकडून करून घेतली जात होती.

आतांच एक कामगारांची तुकडी सैनिकांच्या देखरेखीखाली दुसरा रस्ता बांधण्यास चालली होती, त्या सुंदर व स्वच्छ खेड्यांतही टारझनला शिस्त, समाधान आणि शांतता आढळली.

•••

## स हा

**टारझन** जेव्हा त्या लोकांच्या खेड्यात पोहोचला तेव्हा त्या खेड्याचा राजा ॲडेलड्रोहाकिन याची आणि त्याची भेट करून देण्यांत आली. आपला मुलगा कोमोडोक्लोरेन साल्ड याचे टारझनने त्या अलाली स्त्रीपासून संरक्षण केले हे ऐकून त्याला फार आनंद झाला. आणि त्याची नीट व्यवस्था ठेवण्यास आपल्या अधिकाऱ्यांना त्याने बजाविले.

टारझनला त्या गावात रहाण्यासारखे घर नव्हते. तेव्हा तो एका गर्द छायेच्या झाडाखाली रहात असे. रोज शंभर गुलाम त्याचे जेवण घेऊन येत आणि मग तो आरामांत जेवत असे. तिथे बसे आणि तिथेच झोपे. नंतर टारझन रस्त्यावरून दोन चार वीरांसह फिरायला निघे. सहा फूट उंचीचा टारझन आणि दीड फूट उंचीची माणसे! उगाच एखादा माणूस मुंगी किंवा झुरळासारखा पायाखाली यायचा! रस्तेही अरूंद! तरी पण त्यांच्या मानाने ते विस्तृतच होते. त्या गावात मोठी धामधूम सुरु होती. एक नवी आवढव्य इमारत बांधली जात होती, ती छोटी माणसे चपळाइने काम करताना बघून टारझनला मोठी गंमत वाटे. हजारो भावल्या जर आपल्या आसपास काम करू लागतील तर आपणाला किती गंमत वाटेल? तसेच होई. ती गंमत पहाताना तो तासन् तास रमे.

आतां जे बिल्डिंग बांधले जात होते, त्याची उंची शंभर फूट व घेर दिडशे फूट असावा! पण त्यात आश्चर्य काहीच नव्हते. त्या गावात तशा दहाबारा इमारती होत्या.

राजाच्या राजवाड्याची इमारत तर दीडशे फूट उंचीची होती. घेर दोनशे फूट आणि तीस मजले होते आणि त्यांत ऐंशी हजार माणसे ( बुटकी माणसे) एखाद्या वारुळांतील मुंग्यांप्रमाणे रहात होती. आता तयार होणारी इमारतसुद्धा हजारोंनी रहाण्याइतकी मोठी होती. कामगार चपळाईने काम करू लागले की ते दृश्य मोठे हृदयंगम दिसे.

शहराच्या जवळपास डोंगर असल्याने तेथील इमारतीही दगडी असत. त्यानी जेंव्हा ही इमारत बांधायला घेतली तेंव्हा दिडशे फूट उंची तोलू शकेल इतका मजबूत पाया खणला, तेंव्हा त्यांच्या शिल्पशास्त्राचे टारझनने कौतुक केले. त्यांची खूपच प्रगति त्याला दिसली. त्यांची सौंदर्यदृष्टिही त्याला दिसून आली. अचूक ठिकाणी असे अचूक दगड उपयोगांत आणीत की जणू निसर्गाची त्यांच्यावर कृपाच आहे असे वाटे. आफ्रिकेत काही खांबांसारखे दगड जणू आफ्रिकेत पडणाऱ्या मुसळधार पावसाच्या कृपेनेंच मिळत.

पाया भरून होताच दहादहा फूट उंच खांब गुळगुळीत जणू जमिनींतूनच उगवल्याप्रमाणे बेमालून बसविले. नंतर जमीनही सारख्या आकाराच्या व समांतर, गुळगुळीत अशा दगडांनी तयार केली. जमीन तयार झाल्यानंतर तीन फूट रुंदीचा कमानीचा असा एक सोपा बांधला. हा सोपा इमारती सभोवती बांधला. नंतर सहासहा फुटांच्या अंतरावर दगडी खांब उभे करून भिंती सुद्धा चढविल्या. भिंतीसुद्धा दगडाच्या असूनही कशा सुंदर आणि गुळगुळीत, सुधारलेल्या जगांत जरी इतके सुंदर कौशल्य बघण्यास मिळाले तरी त्यांत नवल वाटावे. यंत्रसामुग्री पुरेशी नसूनही त्यांत त्यानी जणु आपले सर्वस्व ओतले होते.

आफ्रिकेच्या काटेरी रानांत या बुटक्या लोकांनी शिल्पकृतीचे नवेच जग निर्माण केले होते, हे नवलच नव्हे का?

टारझनच्या निरीक्षक बुद्धीला हे एक जणू खाद्यच मिळे.

एकेक मजला सहा सहा फुटाचा, आणि एका एका खोलीला दीड फूट उंच आणि अर्धा फूट रुंद अशा दोन खिडक्या.

इमारतीच्या चार बाजूला मुख्य दरवाजे असूनही बाकी अगणित दरवाजे होते. त्यामुळे हवा व प्रकाश विपुल मिळे. पण आंतमध्ये असणाऱ्या खोल्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात चोविस तास प्रकाश देणाऱ्या दिव्यांची सोय केली होती. दारेही नक्षीदार होती. थोडक्यात म्हणजे हा सर्व अजबखानाच होता.

प्रत्येक मजला दोन तीन फूट मागे बांधला गेल्याने इमारतीचा वरचा भाग निमुळता झाला होता. प्रत्येक मजल्याला सोपा असे.

थोड्याच दिवसांत अर्धी अधिक इमारत तयार झाली. ती पहाण्याची टारझनला जबर इच्छा होई, पण ते शक्य होत नसे.

ह्या इमारती मोठमोठ्या अधिकाऱ्यांसाठी असत. त्यात ते आपले सहअधिकारी आणि गुलाम यांच्यासह रहात.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हाताखाली शेकडो गुलाम असून गुलामगिरीची कोणतीतरी खूण त्यांच्या वस्त्रावर असे. इतरही काही मोठी छोटी दगडी घरे होती. या खेड्यात अधिक भरणा होता तो गुलामांचा व मजुरांचा.

टारझनने त्या लोकांचे जीवन समजून घेतले. पण ते सारे खुणा आणि निरीक्षण यांच्या साह्याने. त्याच्यातलाच तो एक बनला. प्रश्न राहिला तो त्याला ती भाषा शिकविण्याचा किंवा त्याने ती शिकण्याचा. पण टारझन न शिकविताच अनेक भाषा शिकला तो काय ही भाषा शिकणार नाही? त्याला ते जमणार नाही? मग राजाने सांगितल्या-

प्रमाणे वेळ मिळेल तसे अनेक अधिकारी त्याला ती भाषा शिकवू लागले. त्याच्यात कुणाचा पहिलानंबर असेल तर राजपुत्र कोमोडो-क्लोरेनसाल्डचा. तो त्याला अत्यंत आपुलकीने शिकवी. कारण त्याला कृतज्ञता व्यक्त करायची होती.

थोड्याच दिवसांत टारझनने ती त्यांची भाषा आत्मसात केली, आणि मग त्या मुंगीवजा बुटक्यांची समाजस्थिति, त्यांची रहाणी, त्यांचे राजकारण याविषयी कोमोडोक्लोरेनसाल्डला प्रश्न विचारयाला सुरुवात केली.

प्रथम त्या गुलामांपासून त्याने सुरूवात केली 'हे गुलाम का? ते तुमचेच आहेत का? त्यांना गुलामगिरीची चीड का येत नाही?'

राजपुत्र हंसला व म्हणाला, 'हे लोक गुलाम कां? असे तुम्ही विचारता?'

'कोणत्याही देशांत काही सर्वच लोक उच्च दर्जाचे असत नाहीत, तर काही हलक्या दर्जाचे, अडाणी, निर्बुद्ध असतात. त्यांच्याकडून आम्ही तशी कामे करून घेतो. कित्येकांना झाडू मारण्याचे तेवढेच काम येतं, त्यांच्याकडून झाडण्याचे काम करून घेता येते, त्यामुळे स्वच्छतेचा प्रश्न सुटतो. शिवाय त्यांचे ते उपजीविकेचे साधन होते, माणूस फुकट न जाता आमचा फायदा होतो. त्याच्यावरचे लोक म्हणजे अनेक कलाकार, न्हावी, धोबी, स्वयंपाकी, गाडीवाले, शेतकरी, माळी वगैरे! हे त्यांच्या-पेक्षा वरच्या दर्जाचे नव्हेत का?

'तसेच आमच्यात अनेक शिल्पकार, सोनार, कुंभार वगैरे आहेत. असे किती सांगू? पण ते गुलाम नाहीत. त्यांचे जीवन स्वतंत्र आहे, पण असे लोक फार थोडे. तसेच आमचे लहानमोठे अधिकारीही स्वतंत्र आणि स्वतःचे घरदार असणारे आहेत, त्यामुळे आमचे सर्व राज्य व्यवस्थितपणे चालले आहे.

'आता हे गुलाम म्हणजे आम्ही युद्धात जिंकलेले लोक आहेत. आज दोन तीन पिढ्या ते आमच्यात असल्याने त्यांच्यात वाढ झाली आहे. या राज्याच्या पलिकडे आमच्यासारखीच आणखी राज्ये आहेत. लढ्यात हारजीत नेहमीच, त्यामुळे गुलाम कधी कमी जास्त होतात.'

'पण काही गुलाम कामावर जातात तेव्हा त्यांच्याबरोबर सैनिक का असतात ?'

'त्याचे कारण अगदी साधे आहे. जे नवे गुलाम पळून जाण्याच्या प्रयत्नात असतात त्यांना धाक दाखविण्यासाठी हे सैनिक त्यांच्याबरोबर असतात. सैनिक त्रास देत नाहीत. पण ते कैदी आहेत.'

'काही गुलाम शेतमळ्यावर, खाणीत वगैरे काम करताना त्यांच्या मागे सैनिक नसतात. ते गुलाम असले तरी स्वतंत्र जीवन जगणारे असतात. इथला पाऊसही अतिशय जोरात, त्यामुळे पावसाळ्यात ते खाणीतच राहातात. असे असल्याने त्यांना चीड येण्याचे कारण काय ?'

'तुमच्या पलिकडची आणखी राज्ये कुणाची ? ते तुमच्याप्रमाणेच छोटे छोटे असतील ?'

'त्यांची राज्ये आमच्या पलिकडे दूर आहेत. आमच्या हद्दी ठरव-लेल्या आहेत आणि आमच्या सारखेच ते आहेत.'

'मग तुमच्यात लढाया होतात का ?'

'हो ! अलिकडेच आमच्यात एक लढाई होऊन त्यात आम्ही धडा शिकलो. लढाईत आमची हार होऊन आमचे काही लोक गुलाम म्हणून नेले गेले, काही मारले गेले. आम्ही का हरलो, त्यांच्या पुढे दुबळे का ठरलो, ते मजबूत का ? विचार करता करता एकाएकी उत्तर सापडले. प्रजोत्पत्तीला दोनांपैकी एक कुणीतरी सबल पाहिजे. आमच्या शत्रूंनी आपल्यातील सबळ कणखर व श्रमजीवी अशा स्त्रियांशी लग्न

केल्याने प्रजा सबल निपजू लागली, कारण रक्त व जोम यांची देवघेव झाली. म्हणजे मिश्रविवाहच म्हणा ना !'

'आम्ही या बाबतीत फार सोवळे होतो, पण परिस्थितीमुळे जर हा सोवळेपणा टाकून दिला नसता तर आम्ही टिकलोच नसतो, आणि टिकायचे तर सुधारणा हवी ! मग आम्ही त्यांच्याप्रमाणे आमच्यातील सुंदर, सबळ, गुलाम स्त्रियांशी विवाहबद्ध झाल्याने आमचा दर्जा वाढला. आमच्या मुलीही सबळ, सुंदर तरुणांशी विवाहबद्ध होऊ लागल्या. आता वेळप्रसंगी आम्ही शत्रूला पळवून लावू असे आम्हास वाटते.'

नंतर टारझनने त्याला विचारले.

'तू कुणाशी लग्न केले आहेस का ? बायको कशी आहे ?'

'मी अजून अविवाहित आहे, पण लग्न झाले तर आमच्या शत्रू-कडील राजकन्येशी होईल. ती फार सुंदर असून, तिचा आमचा पिढ्यान् पिढ्या रक्ताचा संबंध नाही.'

'तुला कसे कळले ?'

'कारण आम्ही आमच्या राज्यातीलच नव्हे, तर त्यांच्या राज्या-तीलही प्रमुख व्यक्तींची नोंद ठेवतो. विशेषतः राजघराण्यातील व्यक्तींची नोंद घेतो. ही राजकन्या मला योग्य आहे.'

'पण तुझे तिच्यावर प्रेम आहे का ? की प्रेमाशिवाय लग्न ?'

'प्रेम ? त्याला विशेष महत्त्व नाही. आम्हाला मूल होऊन तो इथ-लाच राजा झाला की पुरे !'

टारझन आला तेव्हा इमारतीचे काम अगदी जोरात चालले होते. आता ती इमारत जवळ जवळ पुरी होत आली होती.

आता वेगवेगळ्या निशाण्याबद्दल सांगायचे तर कलावंत अथवा कामगारांच्या छातीवर निशाण्या असतात. दंडावर किंवा पाठीवर निशाणी दिसताच धोबी, न्हावी, शिल्पकार वगैरे आहेत असे ओळखावे.

या सर्व पाहणीत टारझन विचार करीत होता की या प्रदेशातून बाहेर कसे पडावे ? सभोवतालच्या काटेरी रानातून मार्ग काढणें म्हणजे अशक्यच. झाडावरून झेपा घेत घेत जावे तर तीही काटेरी ! या प्रदेशाच्या राजाला ते अशक्य वाटत असल्याचे दिसले, या सर्वांस जे अशक्य ते मला शक्य झालेच पाहिजे, या विचारात असते वेळीच तिथल्या दोन राज्यात एकदम युद्धाला तोंड लागले. त्यामुळे टारझनला काय ठरवावे ते कळेना !

•••

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 38024
विभाग बा.वा.
क्रमांक 3२९८
नों. दि. 10/10/84
वाचनालय शाखा.

# सात

**ओहानाडालमाकुसच्या** राजाकडे त्याचा पुत्र कोमोडोफ्लोरेनसाल्ड याच्याबरोबर आल्यापासून टारझन वेशी जवळच्या मोठ्या झाडाखाली झोपत असे व जेवत असे. असाच तो एक दिवस सकाळी जागा होऊन पूर्वेचे सौंदर्य निरखित असताना कसला तरी आवाज ऐकू आल्याने त्याने कान टवकारले. पण कसला आवाज हे कळेना. पण आवाज होता हे मात्र खरे. आपणास एक वेळ ऐकू येणार नाही, पण या वनराजांचे कान तिखट ना ?

जमिनीस कान लावून पाहिले असता त्याला वाटले की, काळविटावर स्वार झालेले सैनिक येत असावेत, पण घोड्यांच्या टापाप्रमाणे आवाज होता.

आणखी अधिक वेळ वास घेता त्यास असे आढळले की पश्चिमेकडून जमात येत आहे. परचक्र तर नव्हे ?

राजवडा सुमारे शंभर यार्डावर होता. टारझन घाईघाईने गेला असता दरवानाने त्याला अडवले, तेव्हा त्याने त्यास सांगितले, ' तुझ्या राजाला सांग की काही तरी धोका आहे, बाहेर या ! '

थोड्या वेळाने एक अधिकारी एका माणसासह येऊन टारझनकडे चौकशी करू लागला, तेव्हा पश्चिमेकडून बरेच घोडेस्वार येत असल्याचे

सांगितले, आवाज जवळ येऊन पोहोचल्याचे टारझनला समजताच तो अधिकाऱ्यांना म्हणाला, 'हे शत्रू सैन्य असावे! तुम्हाला काय करायचे ते लवकर करा.'

मग त्या अधिकाऱ्याने राजाकडे व सर्व शहरभर संदेश पाठविले. लोक जागृत होऊन मोठमोठ्या इमारतीतून बाहेर पडले, कोणी पायदळ, तर कुणी घोडदळ, कुणी होमगार्ड तर कुणी स्काऊट. पण सर्व लढाऊ. सर्व बाहेर येताच चार विभागात विभागले जाऊन चारी दिशांस पाठवले गेले, पैकी कित्येक घोडेस्वार व पायदळ शत्रूला तोंड देण्यास सज्ज झाले. हे सैनिक राजाने वेशीपासून सुमारे अर्ध्या मैलावर पाठविले होते.

नंतर चारी दिशांच्या मुख्य द्वारावर घोडेस्वार पायदळ आणि शिस्तीसाठी होमगार्ड ठेवले.

इतक्यात राजपुत्र कोमीडो कोरेनसाल तेथे आला. महाराजांनी पश्चिमद्वारातून त्याला आघाडीवर पाठवले होते. टारझनला वाटले की इतकी शिस्त इंग्रजात तरी असेल का?

टारझन कौतुकाने पाहात होता. रणगीत नाही, रणवाद्ये नाहीत, गडबड नाही की गोधळ नाही. जवळून जाणाऱ्या एकदोन सैनिकांकडे पाहाता टारझनला ती जणू मूर्तिमंत शौर्याची प्रतिकेच वाटली.

नंतर राजशाही दगडी इमारतीकडे पाहिले असता त्यास असे आढळले की त्या इमारती जणू अभिमानाने चमकत होत्या. प्रत्येक खिडकीतून वीर उभे होते आणि दगडागोट्यांच्या आणि भाले बर्च्यांच्या राशींनी सज्ज असे होते.

त्याने एका अधिकाऱ्याला विचारले,

'जे व्हेल्टो पॅटिसियन तुमच्यावर नकळत हल्ला करणार होते, पण ते फसले. आता ते काय करतील? परतून जातील काय?'

'अंहं. युद्ध सोडून जाण्याची त्यांना सवय नाही. ते तसे न करता आणखी वेगळा बेत आखतील!'

'बरे, आतां एक प्रश्न विचारतो.'

'कोणता?'

'तुमच्या खाणीतील गुलाम युद्धाची संधी साधून स्वकियाकडे पळून तर जाणार नाहीत ना?'

'नाहीत, कारण ते पाहा, ते पांढऱ्या झग्यातील गुलाम आमचे दोन पिढ्यांचे दोस्त आहेत. ते दगड व खडक पाहा. शिवाय तत्परतेने गस्त घालणारे ते पायदळ पाहा!'

'पण शहर पडले तर?'

'ते असंभव आणि ते खाणीतील एकदोन अधिकारी मेल्याशिवाय खाणीत कुणालाही जाता येणार नाही व खाणीतून कुणाला बाहेर येता येणार नाही. आमचे सैनिक किंवा गुलाम काही लेचेपेचे नाहीत. खरे लढाऊ म्हणजे आमचे घोडेस्वारच. आमच्या पायदळावर कधी लढण्याचा प्रसंगच येत नाही!'

'तुम्ही तर पायदळ. तुमच्यावर लढण्याचा प्रसंग आला नाही तर तुम्हाला दुःख होत नाही का?'

'तसे वाटण्याचे काय कारण? वाटणीला आलेले काम करणे हे आमचे कर्तव्य. शिवाय आमचे कामही तसे जोखमीचे नाही. सर्व दिशांना असणाऱ्या हजारो पायदळावर शहर संरक्षणाची जबाबदारी आहे. ती पार पाडणे म्हणजे भाग्यच नाही का? आणि पुढे गेलेले घोडेस्वार आम्ही सुदैवी मानतो. त्यांच्यामुळे आम्ही यशस्वी होऊच!'

या उत्तराचे टारझनला कौतुक वाटले. प्रत्येक माणसाने पडेल ते काम करण्यात संतोष मानला होता, मग ती पराभूत कशी होणार?

त्याने आपले तोंड वळवून पश्चिमेकडील मैदानाकडे पाहिले, सुमारे

दोन मैल अंतरावर घोडेस्वार एका ओळीत उभे राहून शत्रूची वाट पाहात होते. बाकी विशेष नव्हते.

त्यांच्यात राजकारणातील फसवेगिरी नव्हती. छक्केपंजे नव्हते की काही स्वार्थ साधण्यासाठी पडद्याआडची महत्त्वाकांक्षाही नव्हती. ज्यांचे मन स्वार्थासाठी जळतेय अशा बिनडोक माणसांचा स्वार्थीपणाही त्यांच्यात नव्हता. ते प्रामाणिक असून देशावर, मानवतेवर त्यांची भक्ति होती.

टारझनच्या जवळ एक लष्करी अधिकारी उभा होता. इतक्यात एका स्काऊटने पळत येऊन सांगितले.

दोन्ही सैन्ये युद्धाच्या तयारीने समोरासमोर आली आहेत. आमच्यापैकी एका स्काऊटने एका उंचवट्यावर चढून पहाताच त्याला फार मोठे सैन्य असल्याचे आढळले.

'बरे, तू ही बातमी दुसऱ्या अधिकाऱ्यांनाहि दे!'

नंतर टारझनची नजर मिलिटरी वेषातल्या एका राजाकडे म्हणजे थ्रोहानाडाल मास्कच्या राजा, ॲडन ड्रोहान्कीन याच्याकडे वळली.

टारझन त्याच्याकडे येताच त्याचा चेहरा हास्याने उजळून तो प्रेमाने म्हणाला,

'आपणच आज आम्हाला वाचवलेत! युद्धाची सुरुवात आज होईल याची कल्पना नव्हती. आपण ही बातमी देऊन आम्हास सावध केल्याबद्दल आपला मी आभारी आहे!'

'एकदा तुम्ही माझ्या मुलाला वाचवलेत आणि आज शहराला वाचवलेत! खरेच मी आपला आभारी आहे!' आणि त्याने आभार मानण्यासाठी त्याच्या शरीराला स्पर्श केला. कारण टारझन उंच असल्याने त्याच्या हाताला स्पर्श करणे हे त्याच्या आटोक्याबाहेरचे होते.

आजपर्यंत टारझन या नावाने त्याने कधीच हाक मारली नव्हती.

त्याच्याशी किंवा त्याच्याविषयी बोलताना, ते म्हणत की आमच्या पुत्राचा प्राणरक्षक, प्राणदाता, सन्मान्य पाहुणा, जंगलचा स्वामी वगैरे. त्या प्रेमाच्या हाके मागची भावना टारझनला समजली व तो गहिवरून म्हणाला,

'राजेसाहेब, मी माझे कर्तव्य केले!'

'पण या उपकाराची फेड कशी होईल?'

'आपली मैत्री हेच माझे बक्षीस. याशिवाय दुसरे मला काही नको. माझे नाव घेऊन, एकेरी नावाने मला हाक मारली, म्हणजे आपल्या कुटुंबापैकीच मला एक मानलेत हे काय कमी आहे काय?'

असे म्हणताच महाराजांनी आपले मस्तक त्याच्यापुढे नमवले, त्यानेही तसेच केले, आणि महाराजांना विचारले,

'मला युद्धावर जाण्यास परवानगी मिळेल काय?'

'टारझन, तुम्ही वाटेल ते करू शकता, वाटेल तेथे जाऊ शकता!'

'महाराज, आपली कृपा!'

असे म्हणून तो युद्धभूमीकडे वळला, जाताना त्याने एक झाडाची फांदी तोडून घेतली व तो हसत हसत पुढे निघाला.

जेव्हा तो युद्धभूमीवर पोहोचला, तेव्हा राजपुत्र कोमोडो क्लारैन-सालला फार आश्चर्य वाटले. त्याने त्याच्यापुढे डोके नमवले, त्याच्या चेहऱ्यावर हर्ष उसळला होता.

'युद्धाची काय बातमी?' टारझन म्हणाला.

'आताच आम्ही पिताजींकडे हेर पाठविला आहे. ते अजून शांत आहेत!'

इतक्यात पश्चिमेकडून मोठा आवाज आला.

'झाली युद्धाला सुरुवात!' कोमोडो क्लोरेनसाल म्हणाला, 'ते येत आहेत!'

●●●

# आठ

'ते आले. ते पाहा पुढे आले!' राजपुत्र कोमोडो फ्लोरेनसाल म्हणाला, 'पण मला नीट दिसत नाही. तुम्हीच पाहा ना महाराज! त्यांच्या हालचाली मला सांगाल तर त्याप्रमाणे वागण्यास मला सोपे जाईल!'

टारझनने ते कबूल केले व तो राजपुत्राला सांगू लागला.

'आता ते पुढे येत आहेत. आलेच. मागच्या सैनिकांची रांग पण पुढे सरसावली आहे!'

तेव्हा राजपुत्राने आपल्या सैन्याला काही आज्ञा दिली.

'आता ते आपल्या पुढे गेलेल्या तुकडीच्या रोखाने येत आहेत, सैन्य प्रचंड असून, त्यांनी आपल्या सैन्याचे म्हणजे घोडदळीचे दोन भाग केले आहेत व आपल्या छावणीवरील शिपायांना ते वेढा देत आहेत!' टारझन म्हणाला.

'या लोकांची हीच पद्धत आहे.'

'आणखी हजारो सैनिकांनी पुढे येऊन जोराचा हल्ला चढविला आहे. आता ते आपल्या छावणीला भिडले असून आपले लोकही त्यांचा प्रतिकार करीत आहेत आणि ते पुढे पुढे जात आहेत.'

ते ऐकताच कोमोडो फ्लोरेनसालने, मागच्या तुकडीला कसली तरी आज्ञा केली आणि टारझनकडे वळून तो म्हणाला,

'आमची लढाई ही अशा प्रकारची असते. आमच्या पुढील लोकांवर त्यांनी हल्ला केला आहे ना? आता ते पुढे आमच्याकडे येतील, आता तुम्ही मागे जा. ते आता लढत लढत पुढे आले की आम्ही त्यांच्याशी लढत लढत त्यांना मागे नेऊ. अगदी शहराच्या सीमेपर्यंत!'

'मग ते तुमच्या शहरात शिरतील!'

'ते अशक्य आहे. आमचे हजारो पायदळ तेथे आहेत. पण आता तुम्ही शहरात परत जा. हातघाईवर लढाई आली आहे आता ही लढाई नाही, तर शर्यत होईल!'

'पण तिचा परिणाम?'

'परिणाम काय? ते संख्येने जास्त असल्याने आपल्या बऱ्याच्‌-जणांना कैद करतील, पण उपाय नाही, आम्हीही त्यांचे काही लोक पकडू- युद्धात हे असे व्हायचेच!'

'पण मी इथून हलणार नाही!'

'मग ते तुम्हाला कैद करतील, कदाचित् ठारही मारतील!'

'तरी पण मी जाणार नाही!' आपली झाडाची फांदी हलवत टारझन म्हणाला.

'तुम्ही आपल्या उंचीवर व आकारावर जाऊ नका. फार तर तुम्ही त्यांच्या चौपट मोठे असाल, पण त्यांची संख्या किती आहे ते पहा!'

हे बोलत असताना टारझनच्या शौर्याचे त्याला कौतुक वाटत होते. पण आता बोलायला जास्त वेळ नव्हता. तरी पण तो पुन्हा एकदा आग्रह करून निघून गेला. टारझनने तिकडे लक्ष दिले नाही की तो जागचा हलला नाही, आपल्या बळावर आणि आपल्या आकारावर त्याचा पूर्ण विश्वास होता.

इतक्यात त्या सैनिकांनी टारझनला पाहिले. प्रथम त्याची उंची व आकार पाहून ते दचकले. पण नंतर त्याच्यावर हल्ला करण्यास



झाडाच्या फांदीच्या फटकाऱ्याने सर्वांना पळवून लावले असते पण शत्रूला मारायला जावे तर मित्रच मरणार होते !

धावले. टारझनने झाडाच्या फांदीच्या फटकाऱ्याने सर्वांना पळवून लावले असते पण दोन्ही सैन्ये इतकी एकमेकांत मिसळली होती की शत्रूला मारायला जावे तर मित्रच मरणार होते. त्या फांदीचा काही उपयोग होईना. हजारो वीर अर्थात् शत्रू एक दिलाने त्याच्यावर हल्ला करू लागले आणि त्याला तलवारी टोचू लागले. कुणी लपून, धावत येऊन त्याच्या छातीवर धडका देऊ लागले. आता शस्त्राचा काहीच उपयोग नव्हता. टारझनचे खालचे सारे अंग रक्तबंबाळ झाले होते, पण तो लढत होता. त्याला काही ठाऊक नव्हते. तो हातांनी प्रतिकार करत होता. इतक्यात त्याच्या छातीत तीन-चार धडका बसून तो बेशुद्ध झाला.

●●●

## न ऊ

**टारझन** बेशुद्ध होऊन पडल्याने पुढे काय झाले हे त्याचे त्यालाच समजले नाही. तो शुद्धीवर आला तेव्हा आपण कुठे आहोत हे पहाण्यासाठी त्याने डोळे उघडले, पण काही तरी विचित्र वाटल्याने ते त्याने परत मिटले.

नंतर थोड्या वेळाने डोळे उघडून बघताच दोन मेणबत्त्या जळत असलेल्या त्याला दिसल्या. त्या सुमारे पाच फूट परिघाच्या होत्या. त्यांची वात माणसाच्या मनगटाएवढी जाड होती. त्या मेणबत्त्यांमुळे खोलीत भरपूर उजेड पडला होता त्या. उजेडात त्याला असे दिसले की तेथे दहापंधरा त्याच्याचसारखी माणसे होती; त्याला नवल वाटले की आपल्या उंचीची माणसे इथें कशी ? आपणास ज्यांनी पकडले ती माणसे व्हेल्टोपॅरिस राज्यातील असावी. ती जर बुटकी माणसे, मग ही कोण ? काय आहे हे रहस्य ? नंतर त्याने पाहिले असता त्याच्या-सारखीच पाच सहा माणसे जमिनीवर पडलेली त्याला आढळली; ती जखमी होती. काही माणसे खुर्चीवर, काही माणसे बाकावर बसून आपसात बोलत होती.

मग त्याच्या लक्षात आले की आपले हात बांधलेले असून पाय मोकळे आहेत. तो डोळे आकुंचित करीत, मोठ्या कष्टाने उठला. ती

माणसे त्याच्याकडे पहात होती, त्या पाहाण्याचा अर्थ म्हणजे तो त्यांचा कैदी होता.

त्याने दालनाचे निरीक्षण करताच ही इमारतही त्या शहरातल्या इमारतीप्रमाणे वाटली. खांब, उंच दगड, लाकडी कमानी तसेच व्हरांडे.

इतक्यात एक अधिकारी येऊन टारझनला काही विचारू लागला; पण त्याने काही उत्तर दिले नाही, त्याला वाटले की याला आपली भाषा येत नाही. अकोली पुरुषांप्रमाणे त्याला बोलायला येत नाही असे असावे.

पण टारझनला त्यांची भाषा समजत होती. थ्रोहानाडालमाक्समधल्या लोकाप्रमाणे ती होती. पण त्याला आपणास ही भाषा अवगत असल्याचे दाखवायचे नव्हते. हे वेड पांघरण्यात त्याचा फायदा होऊन त्याला त्यांचे सारे बेत कळणार होते.

नंतर त्यांच्यातील एका माणसाने एका गुलामाला हाक मारून टारझनला उभे करण्यास सांगितले. उभे होताना त्याला फार वेदना झाल्या. त्याचे हात फार गच्च बांधल्याने सुजले होते. त्या अधिकाऱ्याने त्या गुलामाला सांगितले,

'आता ह्याचे हात सोडून कंबरेत एक साखळदंड बांधून तो कडीत अडकवा व त्याला खायला द्या!'

त्याचे हात मोकळे होऊन त्याला खायला मिळताच त्याला बरे वाटले, व तो पुढे काय होते याची वाट पहात बसला. त्याला आश्चर्य हे वाटले होते की थ्रोहाना डालमस्कस लोकांच्याबरोबर लढणारे व्हॅल्टोपॅटिसमॅस्कसचे बुटके लोक गेले कुठे आणि हे उंच लोक कुठून आले. पण विचार करण्यात काही अर्थ नाही. कळेल सारे.

काही वेळाने एक अधिकारी तेथे येऊन म्हणाला, 'आता याला

महाराजांकडे घेऊन जायचे आहे, या राक्षसी माणसाला पहावे असे राजाधिराजांना वाटत आहे!'

आणि मग चार गुलाम व अधिकारी यांच्यासह टारझनची वरात निघाली. अनेक व्हरांडे ओलांडत व मजले उतरत ते खाली आले, आणि दुसऱ्या इमारतीत गेले. टारझन हे पहात होता व मनाशी विचार करीत होता की 'काय आहे हे?'

मागे जाता जाता प्रत्येकजण कुतुहलाने टारझनकडे पहात होता. नंतर ते दुसऱ्या घराच्या सोप्यावर आल्यावर त्याला एकाने प्रश्न विचारला, 'तू झेरटोलाकोलाल आहेस का?'

टारझनने एक जळजळीत कटाक्ष टाकला. त्याला कुणी बंदिस्त करताच त्याच्यातील पशू जागा होऊन तो असाच वागे. लगेच दुसरा म्हणाला, 'याला बोलता येत नाही, पण याचे सामर्थ्य अचाट आहे.'

'कशावरून?'

'मी लढाईच्या वेळी पाहिले ना त्या लोकांना तो घोड्यांसह उचलून फेकत असे जणू काय दगड गोटेच उचलून फेकतो अशा थाटात!'.

'पण हा झेरटोला कोलाल नाही हे कशावरून?'

'कारण ते फार भित्रे असतात!'

नंतर आणखी एकाने पुढे होऊन त्याने त्याच्या जखमा तपासल्या. त्या जखमा या सात दिवसात बऱ्या झाल्या होत्या.

जेव्हा राजवाड्याच्या इमारतीत टारझनला आणले तेव्हा त्याला असे आढळले की पूर्वीच्या इमारतीपेक्षा ही इमारत अतिशय सुंदर होती, उंच, विस्तृन, गुळगुळीत भिंतींची आणि रंगीत दगडांनी सजलेली.

हे सारे पाहाण्याच्या नादात काही क्षण टारझन आपले दुःख विसरला. निरीक्षक बुद्धि व ज्ञान संपादन करणे हे त्याच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते.

जसजसा टारझन त्या चिंचोळ्या मार्गातून पुढे जात होता, तसतसा

मेणबत्त्यांचा उजेड अधिक होत होता. या मेणबत्त्या पूर्वीच्या मेणबत्त्यापेक्षा लहान होत्या व उजेड तेजस्वी होता, पण त्या अनेक होत्या. टारझनच्या नंतर लक्षात आले की त्यातील वातीतून धूर निघत नव्हता; भिंती काळ्या होत नव्हत्या. पूर्वीच्या मेणबत्तीतील जाड वातीमुळे भिंतींचे छत काळे पडत असे.

टारझन एका टोकाला येताच त्याच्या बरोबरचा माणूस पहारेकऱ्यास म्हणाला, 'आम्ही याला इथे राजाज्ञेने आणले आहे. याला राजापुढे उभे करायचे आहे!'

आणि त्याला दुसऱ्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून तो गेला. तो अधिकारी त्याच्यासह काही दालने ओलांडून गेला आणि तेथील अधिकाऱ्याला म्हणाला,

'याला आता महाराजांपुढे उभे करायचे आहे!'

'बरं, तू जा. मी काय करायचे ते पाहातो!'

त्या अधिकाऱ्याने टारझनकडे पाहून आपल्या गुलामाला आज्ञा केली, 'ह्याच्यासाठी लांब कुडते घेऊन ये!'

पण तो अधिकाऱ्याकडे पाहात राहिला; त्याला नवल वाटत होते.

'जा! पाहातोस काय? याला खाणीवर कामाला पाठवायचे आहे!'

त्याने त्याच्यासाठी एक हिरवा कुडता आणून तो अंगावर चढवून पाहिला व म्हणाला,

'यावर खूण कोणती करायची? हा कुणाचा गुलाम?'

'हा जोहान्सथ्रोहागो याने लढाईत पकडलेला माणूस आहे. तेव्हा त्याचीच निशाणी हवी. कारण तो त्याचा गुलाम आहे!'

मग त्या गुलामाने खूण करण्याचे साहित्य आणले, काळी शाई, ठसा, आणि लाकडाच्या लाटण्यासारखे काहीतरी.

त्याने प्रथम शाईत बुडवून तो ठसा उठवला, आणि मग त्या

लाटण्यासारख्या लाकडाच्या तुकड्याने तो ठसा अनेक वेळा दाबला आणि खूण उमटली. नंतर ते कुडते टारझनच्या अंगात घालून ते त्याला पुढे नेऊ लागले. हे कुडते पायघोळ होते.

नंतर आणखी काही दालने ओलांडून ते राजगृहापर्यंत आले. तिथे त्याला बाहेर उभे करण्यात येऊन एक माणुस वर्दी देण्यासाठी आला.

'आण त्याला!'

टारझनला ज्या एका सुशोभित अशा दालनात आणले गेले, ते दालन व तेथील देखावा पाहून त्याचे डोळे दिपले. सर्वांचे कपडे रत्नजडीत असे होते, पण ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे कमी अधिक प्रमाणात होते.

त्या दालनात एक अधिकारी आरामखुर्चीवर स्थानापन्न झाला होता. टारझनला त्यांनी त्या अधिकाऱ्यापुढे आणला. त्याने विचारले.

'हा जोहान्सथोहागोचा गुलाम काय?'

'होय.'

हे ऐकताच तो अधिकारी त्याच्याकडे तीक्ष्ण दृष्टीने पाहू लागला. कारण आधीच त्याला टारझनबद्दल बरेच कळले होते.

नंतर त्याने राजाकडे दूत पाठवला.

थोड्याच वेळात राजे आले व सिंहासनावर बसले. ते येताच दूतांनी ललकारी दिली.

'इकामोईलहागो, व्हेलटोपॅटीस आकसचे महाराज. सर्वाधिकारी, सर्व उत्पन्न केलेल्या वस्तूंचा धनी, सर्वज्ञ, सर्वालंकार, सर्वशूर! आम्ही तुझ्याकडे हजारो गुलामाचा जो स्वामी, जोहान्सथोहागो याचा गुलाम आणला आहे.'

'त्या गुलामाला जवळ आणा!'

टारझनला जवळ आणले गेले.

‘ हाच तो राक्षस यालाच जोहान्सथ्रोहागने थ्रोहानाडालामास्कसहून आणले. ’

‘ अस्से !’ राजाने त्याच्याकडे निरखून पाहिले. थ्रोहानाडाल मास्कचा काय ?’

‘ होय भूपणालंकार ! आपण त्याच्याबद्दल ऐकले आहे. ’

‘ आणि जोहान्सथ्रोहागाची ही पैज ?’ राजानें विचारलें.

‘ होय ! जोहान्सथ्रोहागाची पैज सर्वज्ञ ! ’ एकाने उत्तर दिले.

‘ तुम्हाला त्याच्याबद्दल काय वाटते ? ’ इकामोएलहागो महाराजांनी विचारले.

‘ आपणाला वाटते तसेच महाराज !’ दुसऱ्याने उत्तर दिले.

असे तो दुसरा बोलला खरा पण ते सहा जण अगदी गोंधळून गेले होते. त्यांनी एकमेकाकडे पाहिले. शेवटचा सहावा हळूच म्हणाला,

‘ पण त्यांना काय वाटते हे आपणाला कुठें ठाऊक आहे ? ’ आणि ते एकमेकाकडे पाहू लागले. त्यांचा गोंधळ उडालाच होता. राजाला ते कळले.

‘ गोफोलोसो ! आता तू काय म्हणालास ?’ राजाने जोरात विचारले.

पण गोफोलोसो शहाणा होता. त्याने चटकन बाजू सावरून नेली.

‘ जोहान्सथ्रोहागनें आपली अनुमति घेतल्याशिवाय ही पैज मारली नाही कदाचित् ही पैज तो हरेल. ’

‘ होय ! त्याने माझे मत अगोदर घेतले होते. हा जो शोध आम्ही लावला तो मी लावला. हे कल्पनाचे तत्त्व. त्याने ती गोष्ट शक्य झाली पण आता तो शोध तितकासा अचूक आहे असे वाटत नाही. त्याच्याबाबतीत प्रयोग केले पाहिजेत आणि या प्रयोगाला तेहतीस महिने लागतील असे वाटते. जर हा शोध यशस्वी ठरला नाही तर जोहान्सथ्रोहागोला हजारो गुलाम गमवावे लागतील. ’

 ग्रं. क्र. ११३८८ ... दि. ... 

‘ हजारो गुलाम गमवावे लागतील ?’

‘ फार विलक्षण ! फार विलक्षण ! ’ गोफोलासो म्हणाला.

नंतर राजाची दृष्टी टारझनकडे वळली. त्याने त्याच्याकडे निरखून पाहिले व विचारले,

‘ कोणत्या शहरातून तू आलास ? ’

टारझनने काहीच उत्तर दिले नाही.

‘ महाराज ! येथे आल्यापासून त्याने एकहि शब्द उच्चारलेला नाही. त्याला उलाबी लोकप्रमाणे बोलता येत नाही. नाहीतर तो झेराटोला-कोलाल असावा.

राजाचा दुसरा अधिकारी म्हणाला, ‘ आणि आम्ही किती मूर्ख ! अजून आम्हाला ही गोष्ट कळली नाही, आमचे महाराज सर्वज्ञ आहेत म्हणून आमचा निभाव लागतो. ’

ते ऐकून राजा खूष झाला आणि त्यानें आणखी निरखून टारझन-कडे पाहिले आणि तो पुन्हा म्हणाला,

‘ त्याचे शरीर त्यांच्यासारखे नाही. त्याचे डोके पहा ! ते ज्ञान मिळवण्याकरिता, विचार करण्याकरिता उत्पन्न केलेले आहे. तो झोरटोला-कोलाल नाही. त्याचे कान पहा, त्याचे डोळे पहा. त्यात बुद्धीचे तेज आहे. विलक्षण ! ’

‘ मी सांगितले नाही आपल्या महाराजांचे बोलणे नेहमी खरे असते. ’ मोकेलासो म्हणाला. ‘ तो झोरंटोला कोलाल नाही. ’

इतक्यात बाजूचा दरवाजा उघडून एक दूत आत आला व म्हणाला,

‘ राजकन्या दरबारात येऊं इच्छिते, महाराज ! ’ व त्याने नमन केले.

‘ येऊ द्या. ’

लागलीच राजकन्या झांजरा आत आली, ती दाराजवळच असावी.

ती आत येताच राजाने तिला सिंहासनाजवळ बोलावले पण ती टारझनला निरखीत त्याच्याजवळच उभी राहिली.

टारझनने पण विचार केला आपण पण तिच्याकडे पाहून घ्यावे. कोमोडोक्लोरेनसाल हिच्याबरोबर लग्न करायला तयार आहे. कशी काय आहे बघू या.' आणि तिच्याकडे पाहाताच टारझनचा विरस झाला.

तिचे केस लांब व करडे होते. डोळे पिंगट होते. त्यात मार्दव वा नम्रता नव्हती. ती टारझनला काही प्रश्न विचारणार तोच महाराज म्हणाले,

'त्याला बोलता येत नाही, राजकन्ये!'

'अस्से!' आपली रत्नजडीत कंकणे खालीवर करीत ती म्हणाली,

'मग मी त्याला आता बोलता करते.'

आणि आपली छोटी बरची त्याच्या दंडावर टोचून म्हणाली, 'हे पहा, हे पहा!'

रक्ताची चिळकांडी उडाली अर्थात् टारझनला वेदना झालीच पण त्याच्या तोंडून आवाज फुटला नाही.

राजकन्या चिडली.

आणि आता ती त्याला पुन्हा टोचणार तो महाराज ओरडले,

'झांजरा! हात मागे घे! मला त्याच्यावर काही प्रयोग करावयाचे आहेत.'

'माझ्याकडे त्याने एकटक पाहिले आहे. आणि त्याने माझ्याबरोबर बोलण्याचे नाकारले आहे. तो बोलला असता तर मी खूष झाले असते.'

'तो तुझा बळी नाही. तो जोहान्सथोहागोचा गुलाम आहे.'

'मग मी त्याला विकत घेईन. जारे जोहान्सथोहागोला बोलवा.'

●●●

राजीव ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम 38024
विभाग अ.व.
क्रमांक 3891
नों. दि. 13/07/88
ग्रंथालय शाखा

# दहा

झांजरा महाराजांच्या दालनातून अत्यंत रागाने निघाली.

महाराज तिला म्हणाले,

'झांजरा! हा गुलाम तुला मुळीच विकत घेता येणार नाही. मी त्याला खाणीवर पाठविणार आहे.' आणि त्याच वेळी त्यांनी खाण मंत्र्याकडे निरोप पाठविला की, 'ह्या गुलामाची काळजी घ्या. त्याला फार काम देऊ नका.' पण संतापलेली झांजरा महाराजांकडे पाहून मनात म्हणाली,

'मी त्याला विकत घेईनच. मला वाटले तर त्याला ठार मारीन. मला कोण विचारणार?'

आणि ती कुचेष्टने हंसली. तेव्हा तिच्या दोन दासी आणि तो अधिकारी पण हसला.

अर्थात झांजराचे हे चाळे महाराजांना दिसले नाहीत.

नंतर गेफास्टो आपल्या जागेवरून उठला. राजा गेला होता त्या दिशेला त्याने पाहिले. बाजूच्या खोलीत त्याने नजर टाकली आणि भिंतीला कान लावला आणि बाकीच्यांना म्हटले, 'भिंतीला कान असतात असे म्हणतात, पण मी म्हणतो भिंतीचे दगड पण बोलतात. पण भिंतीचे दगड बोलले तरी मी भीत नाही, कारण मी खरे तेच

बोलणार आणि त्याने इतर पाच जणांकडे पाहिले, आताच पहा ना! हे आपले महाराज इकोमोएल हागोस यांना काय समजते? पण ज्ञानाचा किती आव आणतात! आपण त्यांना सर्वज्ञ, सर्वेश, श्रीमान् म्हणतो आणि त्याने ते चढून गेले आहेत.'

मग बाकीच्यांना पण वाचा फुटली. हे सहा जण म्हणजे खरे आधार होते राज्याचे. दरबारचे 'राजपुरुष' असा किताब होता त्यांना. त्यांच्याकडे काही खाती होती. त्या खात्याचे 'राजपुरुष' नव्हे पण ते मंत्री होते.

'आता पहा! गेफास्टो हा सेनापति आहे. त्याच्यामुळेच या युद्धात आपणाला जय मिळाला. जर महाराजांचे त्याने ऐकले असते तर!'

'पण तो शहाणा. रणमैदानावर पाऊल ठेवताच त्याने आपल्या मताप्रमाणे सैन्याच्या हालचाली केल्या. आपण त्यांना थोहानझेलमाक्सला चकित करायला गेलो. पण आपण फसलो. ते कसे सावध झाले कोण जाणे? पण महाराज म्हणाले, 'आता आपण परतू. तुम्ही त्यांचे ऐकले असते तर आपणाला जय मिळाला असता का?' गोफोलासो म्हणाला.

'आता हा मॉकाहागो घ्या. इमारत खात्याचा मंत्री. जोहान्सथ्रोहागाची तो बांधकामात बरोबरी करील का? पण काही बिघडले की मॉकाहागो त्याला दोष देतो.'

'ज्याला शेतकीची माहिती नाही तो शेतकी मंत्री. ज्याला खाणीची माहिती नाही तो खाण-काम मंत्री! फक्त दोनच मंत्री आपल्या जागांना लायक आहेत-गेफास्टो व व्हेस्टाको.'

'व्हेस्टाको हा राजदरबाराची व्यवस्था पाहतो आणि तोच त्या जागेला लायक आहे पण....'

'जाऊ द्या ते! पुढे बोला.'

'काय बोलायचे?' गोफालासो म्हणाला, 'व्हेलटोपरीस माकच्या

यशाला याच्या गर्वामुळे धक्का लागेल. हे नालायक आहेत. हे राजे कसले ?'

आणि थ्रोबाल्डोन शेतकी मंत्री म्हणाला,

'त्याने आपणा सहजणांना आपले मंत्री नेमले आहे. तो आपणाला राजप्रमुख म्हणतो. आमच्यापेक्षा एकाही व्यक्तीचे ज्ञान जास्त नाही. आमच्या सहाजणांच्या ज्ञानभांडारावर व अक्कलेवर व्हेल्टोपॅटीस माक्सचे राज्य चालणार असे लोकांना वाटते. पण हा सर्वज्ञ शहाणा आमच्या कारभारात ढवळाढवळ करतो. आमच्याच हाती आमचे अधिकार असले तर ते त्याच्या राजशाहीवर आक्रमण होते. जोश करावा तर तो राजद्रोह होतो आणि आपली न्यायबुद्धी वापरावी तर ते नाशाला कारण होणार! अशाप्रकारे आम्ही अधिकाराच्या जागावर राहिलो तर व्हेलटोपॅटीराच्या लोकांना काय फायदा ?' गोफोलोसोने एक फटकारा मारला.

'पण त्यांना आपणाबद्दल काय वाटते ते प्रसिद्धच आहे. ते असेच म्हणतात की आमची जी निवड झाली आहे ती काही आम्हाला त्या त्या खात्याचेच ज्ञान आहे म्हणून नव्हे तर त्या खात्याबद्दल अज्ञान आहे म्हणून. आता माझेच पाहा ना, माझी निवड कितीशी योग्य आहे? माझी चतुराई पहा तर मला शेतकी मंत्री नेमून मी जनावरांची निपज उत्तम करण्याच्या खात्यावर असायला पाहिजे. पण मला सर्वांचा प्रमुख बनवला आहे. मला ती जागा मुळीच आवडत नाही आणि माझा तिथे काही उपयोग पण नाही.' थ्रोबालडोन म्हणाला.

'जर त्या दिवशी गेफास्टो नसता तर थ्रोनाडाल माक्सच्या लोकांनी आम्हाला जिंकले असते.'

'तुम्ही पाहिलेच असेल की त्या आणीबाणीच्या वेळी मी अगदी

जलदीने आपल्या वीरांना सोडवले आणि जयश्री आपणाकडे वळवून घेतली नाहीतर किती लोक कैदी झाले असते कोण जाणे?'

'फार, फार तुम्ही त्या दिवशी औदार्याने वागला. त्याकरिता सर्व सैनिक तुम्हाला आज वंदनीय मानतात. तुमच्यासारखा राजा सैनिकांना आवडतो.' आतापर्यंत राजवाड्यावरचा सर्वाधिकारी (Royal-Major Demo) स्वस्थपणे ऐकत होता. ते बोलत असताना तो अगदी स्वस्थपणे ऐकत होता. पण आता तो बोलू लागला—

'आपण आता महाराजावर टीका केली हा राजद्रोह होत नाही का?'

'छे! छे! आम्ही काही राजद्रोह करावा म्हणून बोलत नव्हतो आणि व्हेस्टोका! तुम्हाला समजले कसे नाही की आम्ही फक्त थट्टा करीत होतो. आपण तर सारे मित्र आहो. राजाचा अनादर कोण करील?'

'आणि हे पहा, मला बरी आठवण झाली आपण माझ्याकडे माझा तो हुशार गुलाम मागितला होता नाही का?' गोफोलासो म्हणाला.

'होय.' व्हेसटाको म्हणाला.

'मग संध्याकाळपर्यंत मी तुमच्याकडे दोन गुलाम पाठवतो. तो दुसरा गडी चांगला आहे.'

पण याचवेळी गोफोलासोच्या अंगाला दरदरून घाम सुटला होता. हा घातकी मनुष्य काय करील नि काय नाही.

आणि सर्वांची गेफास्टोखेरीज तारांबळ उडाली होती, प्रत्येकाला कुठल्या कुठे आपण या भानगडीत पडलो असे झाले. आणि त्याकरिता त्यांनी प्रत्येकाने त्याला खूष करण्याचा प्रयत्न चालवला.

कोणी त्याला हजार तर कोणी पाचशे गुलाम देऊ केले. आजचे मरण उद्यावर ढकलावे असे त्यांना वाटले पण तसे भय बाळगण्याचे कारण नव्हते. व्हेस्टोकाची मनोमन खातरी होती की जगातला प्रत्येक माणूस

लांचलुचपत घेणारा असतो. तो पण घेणार होता व सारे ठीक करणार होता. नंतर गेफास्टो व गोफोलासो त्या व्हरांड्यातून जात असता ते एकमेकांबरोबर अनेक विषयावर बोलत होते.

'मला वाटते व्हेस्टोकासारखे लोक आपणात आहेत तोपर्यंत आपल्या व्हेलटोपॅटीसमाकुस् शहराचा निभाव लागणार नाही. त्याला राजा मरो की रंक मरो याची परवा नाही. त्याचा तळीराम गार झाला की बस. तो सर्वांकडून लाचेच्या रूपाने द्रव्य घेतो, गुलाम घेतो आणि प्रसंगी तो राज्याचा विश्वासघातहि करील. शिवाय थ्रोन्हॅलडो त्याचा चांगला मित्र आहे.'

'आणि दिवसेदिवस तू पहात आहेस राज्यकारभारात अंदाधुंदी अन् ऐषआराम शिरला आहे. अवाढव्य खर्च चालला आहे. पण कोण करतोय विचार?'

गेफास्टो म्हणाला. 'याने कसे भागणार?'

'आणि ते कर लादणे! श्रीमंतावर कराचा बोजा फार पडलाय.'

'गोफोलासो! अंहं, तुझे मत चुकीचे आहे. श्रीमंतावर कराचा बोजा मुळीच नाही. सरकारने त्यांच्यावर कर बसविले की ते घरभाडे वाढवतात. तो कराचा पैसा दीनदुबळ्या लोकांच्या माना पिळून मिळवतात, सरकारला कर भरतात. त्यांच्या खिशाला मुळीच खार लागत नाही, आणि कराची आखणी अगदी चुकीच्या तत्त्वावर आधारली आहे. त्यामुळे देशाचा फायदा न होता तोटाच होत आहे.' ग्रेस्टोक म्हणाला. 'आणि दारुबंदी! या दारूबंदीमुळे केवढे उत्पन्न बुडाले आहे आणि लोक वाममार्गाला लागले आहेत. त्यांना दाबात ठेवायला पोलिस खाते वाढवायचे आणि कर वाढवायचे, लोकांचे नुकसान आणि सरकारचेहि नुकसान! आणि दुसरे तुला सांगतो, युद्ध आणि

दारू दोन्ही माणसाच्या प्रगतीला कारण होतात. पण दारूचा अतिरेक नसावा.'

'युद्धाने माणसे कामसु बनतात, बनावेच लागते, युद्धाचे अनेक नवे नवे शास्त्रीय शोध लागतात. अंगातली चरबी वितळते आणि मेंदूची प्रबळ होते.'

अशी ही व्हेलटोपॅटीसच्या राज्याची स्थिती होती. ती दोघेच ओळखून होते. ते दोघे राज्यात नरवीर होते. पण खरे लबाड, लाचखाऊ, दुटप्पी होते. इतर काहीही असो; पण देशातील अधिकारी लाचखाऊ झाले की सामान्य जनताही त्यांचा कित्ता गिरविते आणि शत्रूंचे फावते.

अनेक देशात तसे झाल्याने देश रसातळाला गेले आहेत.

जाता जाता गेफास्टोच्या मनात असे विचार येत होते.

●●●

# अकरा

**राजाने** टारझनला एका अधिकाऱ्याच्या ताब्यात दिले होते तो टारझनला घेऊन निघाला. खाण राजवाड्यापासून दिड-दोन मैलांवर होती. आतां टारझन पूर्ण मोकळा झाला होता. पण त्यांच्या मनाने तो झौनथोल (राक्षस) होता. तरी त्याची उंची काही एक किंवा अर्ध्या इंचापेक्षा जास्त नव्हती, जाताना ते सारे टकमक पाहात होते. कसाही असला तरी तो इतरांपेक्षा वेगळा होता, पण आज गुलाम होता.

याच वेळी ते त्रिकूट खाणीच्या तोंडाशी आले होते. खाणीच्या तोंडाशी एक खोली होती. खोलीमध्ये एक अधिकारी होता, त्यांच्या स्वाधीन टारझनला करून तो म्हणाला, 'याला ताब्यात घ्या! याला महाराजांनी पाठवले आहे. याला काम द्यायचे पण हलके. याच्या अंगाला हात लावायचा नाही.'

'अस्से! पण याचे नाव काय? मी ऐकले आहे की याला राक्षस म्हणतात.'

त्याने आपली चोपडी उघडून टारझनला विचारले, 'काय रे तुझे नाव काय?'

'त्याला बोलता येत नाही. तो मुका आहे.'

'म्हणजे. झेरटोला कोलाल कीं काय ?'

'नाही. तो झेरटोला कोलाल नाही. तो जोहन्सथ्रो हागोचा गुलाम आहे. त्यानेच त्याला युद्धात पकडलेय.'

'मग त्याचे नाव काय लिहू ?'

'नुसता नंबर द्या.'

'अहं! तसे चालणार नाही.'

'मग त्याने त्या पुस्तकात लिहिले जोहान्सथ्रोहागोचा गुलाम. झौन-थ्रोल.... झौनथ्रोल!'

'बरें ? तू वाटेल ते कर. मी तुझ्या स्वाधीन त्याला केलेय.' असे म्हणून तो गेला.

मग त्या अधिकाऱ्याने त्याला दुसऱ्या आपल्या दुय्यम अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून म्हटले, 'याला फालकास्टोवान याच्या स्वाधीन कर.' नंतर तो अधिकारी त्याला घेऊन निघाला. पहिल्याने ते एका अरुंद मार्गात शिरले. इथे फारसा उजेड नव्हता, पण जसजसे ते पुढे जाऊ लागले तसतसा तो मार्ग रुंद होऊ लागला. आणि आता उजेड व हवा पण बरी होती. चागले दिसूं लागताच टारझनने सभोवार दृष्टी फिरवली. जणू तो सर्व गोष्टी टिपून घेत होता. टारझनची ती संवयच होती. वेळ पडली तर सुटका करून घ्यायला पण बरे असते त्यामुळे.

नंतर त्याने तिथे पाहिले तर तिथून अनेक मार्ग फुटले होते. जणू मार्गाचे जाळेच ! आणि त्या मार्गातून ते गुलाम जा-ये करीत होते तेव्हा टारझनने तर्क केला बाहेर जी मोठी इमारत बांधीत आहेत त्या कामा-वर ही माणसे असावीत. ह्या इमारती म्हणजे मोठे मोठे डोमस् होते. असे डोमस् त्या गावात आठ होते आणि तो नववा बांधला जात होता. आणि त्या एकाएका डोमची किंवा इमारतीची उंची तरी किती ? चारशे किंवा साडेचारशे फूट ! आणि खालचा पायाहि चारशे की पाचशे

फूट. ही डोमस् वर्तुळाकार असल्यामुळे परिघ अतिशय मोठा असे. तसेच व्हरांडे, तशाच गॅलऱ्या! ते सारे पाहून टारझन थक्क झाला होता. ओदाबाडाल माकस्च्या इमारती फार तर दोनशे अडिचशे फूट उंच असत.

बोगद्यातील एका वाटेने त्या अधिकाऱ्याने टारझनला नेले. जाताना टारझन निरखून पहात होता. या बोगद्याच्या भिंती पण गुळगुळीत होत्या. मध्येमध्ये चार चार फुटावर कोनाडे होते. त्या कोनाड्यात मोठ्या मेणबत्त्या जळत होत्या. आणखी पुढे गेल्यावर जमिनी-खाली बोगद्यात आणखी इतके बोगदे होते की ते मोजण्याच्या भान-गडीत टारझन पडला नाही. त्याला इतकेच पाहायचे होते की त्यातून सुटकेचा मार्ग मिळेल का?

त्याला यापैकी एका कडेच्या बोगद्यात नेण्यात आले. तिथे त्याला गुलामांच्या दोन रांगा दिसल्या. एक ओझे घेऊन जाणारी व दुसरी रिकाम्या हातांनी परत येणारी.

बराच मार्ग ते चालून गेले. त्या पहिल्या अधिकाऱ्याने टारझनला तिथे असणाऱ्या दुसऱ्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून म्हटले.

'याला हलके काम द्यायचे. याच्या अंगाला हात लावायचा नाही!'

'वा! याच्यावर इतके प्रेम? पण मला जमेल तेवढे मी करीन!'

'तुला वाटेल ते कर. माझी जबाबदारी संपली. पण ती राजाज्ञा आहे.' आणि तो निघून गेला. मग त्या अधिकाऱ्याने टारझनचे निरीक्षण चालवले— 'याला काम कमी! हा झौनथ्रोल! जोहानथ्रोहागोचा गुलाम! गुलाम! वा! वा! पण त्या निर्बुद्ध राजाची पर्वा कोण करणार?'

संध्याकाळ झाली, काम बंद करण्याच्या घंटा घणाणल्या आणि मग एकच गोंधळ उडाला.

सारे आपापल्या जागी जाऊ लागले. टारझनला जागा नव्हती. तो एका बाजूला उभा होता. तोच कोणीतरी त्याच्याजवळ आले. पहातो तो एक अधिकारी. त्याने त्याला चार पाच रस्ते ओलांडून एक मोठा हॉल होता तेथे नेले, त्या हॉलमध्ये बरेच गुलाम होते. स्त्री-पुरुष एकत्र होते. टारझनला त्या हॉलच्या टोकाशी नेण्यात आले. तेथे एक गुलाम मुलगी बसली होती.

तो अधिकारी टारझनला तेथे सोडून गेला. पुढे काय ?

तो जाताच ती गुलाम मुलगी टारझनकडे पाहू लागली. कारण तो सर्वांपेक्षा वेगळा होता. त्याचा रंग थोडा पिंगट गोरा होता. तो धिप्पाड होता.

'तुझे नाव काय ?' टालास्कारने त्याला विचारले.

'माझे नाव ? मला नाव नाही !' तेथे त्याला कैदी करून आणल्यापासून अजून त्याने तोंडातून एकहि शब्द काढला नव्हता. प्रथम तो बोलला तो आताच.

'मला झौहनथ्रोल म्हणजे राक्षस म्हणतात. तशीच त्यांनी नोंद केलीय.'

'पण त्यांनी तुला राक्षस का म्हणावे ? इकडल्या लोकांपेक्षा फार तर तू अर्धा इंच उंच असशील !'

'मला त्यांनी इथे आणलेय ते जोहानथ्रोहागोचा गुलाम म्हणून. सध्या तसे म्हटले तर मी इकोमोएलाहागोचा गुलाम आहे.'

'पण तुमचा नंबर ?'

'कोण जाणे ? मला तरी काय माहीत ?'

मग तिने त्याच्या कुडत्यावरचा नंबर वाचला.

'मी सांगते. तुझा नंबर आठशे घन अधिक एकवीस ($८००^{३}+२१$)

'अस्से ! मला ते वाचता येत नाही.'

'आणि माझ्याजवळ जो गुलाम आहे त्याचा नंबर आठशे घन एकोणीस आहे. ($८००^३+१९$)

पण तो काहीच बोलला नाही. त्याने तिचे निरीक्षण चालवले. ती कल्पनेच्या बाहेर गोरी होती. म्हणजे सफेत होती म्हणा ना. तिचे डोळे निळे होते. उंची बरी होती. केस विपुल होते. तिला सुंदर म्हणायला हरकत नव्हती. मात्र तिच्या रंगाचे त्याला आश्चर्य वाटले, 'इतका पांढरा रंग कसा?' मग त्याने तिला तिची हकीकत विचारली तेव्हा ती म्हणाली,

'मी इकडेच जन्मले. बाहेरचे जग मला माहित नाही आणि तू बाहेर जाऊ नकोस असे मला आईने सांगितलेय.'

'तुझी आई कुठे आहे?'

'तिला त्या लोकांनी चार वर्षांपूर्वी इथून नेले. पुढे तिचे काय झाले हे मला माहित नाही. तिला नेताना पांढरे कुडते दिले होते.'

टारझन समजला. पांढऱ्या कुडत्याचे गुलाम म्हणजे वरच्या दर्जाचे गुलाम. ते वर गेले की त्यांना बरेच स्वातंत्र्य मिळते. त्यांची लग्ने होतात. स्त्री दिसायला चांगली असली की व्हेलटोपॅटीसमाक्सचे लोक तिच्याशी लग्न करतात.

'मग तुला का नेले नाही?' टारझनने विचारले.

'तू कधीही वरच्या जगात जाऊ नकोस असे आई म्हणाली होती.'

'तू जाणार नाहीस, पण ते तुला नेणार नाहीत असे व्हायचे नाही. तू तर सुंदर आहेस.'

'पण मला कुरूपहि होता येते. जेव्हा ते अधिकारी या दालनाची पाहणी करावयास येतात तेव्हा मी कुरूप होते.'

'म्हणजे?'

मग तिने भिंतीकडे तोंड फिरवले. आणि चोळ चोळ चोळले व

त्याच्याकडे तोंड वळवले आणि तो दचकला. किती पण ती त्याला कुरूप दिसली. त्याला किती आश्चर्य वाटले !

'हे कसे ?' त्याने विचारले.

नंतर तिने आपले केस सारखे केले तोंडावरून हात फिरविला आणि ती पूर्वीसारखी झाली.

'माझ्या आईला त्यांनी युद्धात पळवून आणले. आमच्या शहराचे नाव होडालामाकस. माझे वडील तिथे आहेत. माझी आई गरोदर असताना त्यांनी तिला इथे आणले. मग दोन महिन्यानी माझा इथे जन्म झाला. तेव्हापासून मी इथेच आहे.'

'पण बाहेर जावे हे बरे. बाहेर गेले की तुझे एखाद्या चांगल्या तरुणाशी लग्न होईल. आयुष्याला दिशा लागेल. इथेच सडून मरण्यात काय अर्थ ? तुझा रंग पाहिलास का ? सूर्यप्रकाशाच्या अभावी तो कसा झाला आहे ?' टारझन म्हणाला. 'टालास्कार ! तू बाहेर जा. कदाचित् तिथे सुटका करून घेण्याचा मार्ग पण सापडेल.'

त्याचे इतके बोलणे होते आहे तो त्या दालनात अनेक चुली पेटल्या. अनेक गुलाम स्त्रिया स्वयंपाकाला लागल्या. आणि टारझनला नवल वाटले. इतक्या चुली पेटत असताना धूर किती थोडा ! हे कसे ? त्याने पाहिले धूर जायला मार्ग होता पण तरीसुद्धा फारसा धूर नव्हता. मग त्याने त्या कोळसेवजा लाकडाकडे पाहिले. त्यातून फारच थोडा धूर निघत होता. गॅसच्या बत्तीप्रमाणे ती लाकडे जळत होती.

इतक्यात टालास्कारचे मास भाजून झाले. तिने त्या मासाचे तीन तुकडे केले. एक तुकडा टारझनला दिला. तो खात खात टारझनने विचारले,

'तो दुसरा तुकडा कुणाला ?'

'तो आताच येथे येऊन गेला ना ! त्याला.'

'तू त्याचा स्वयंपाक करतेस?'

'त्याने सांगितलेय म्हणून करते.'

टारझन तो मासाचा तुकडा खाता खाता म्हणाला,

'हे मास कच्चे असते तर काय गंमत झाली असती!' त्याला कच्चे मास बऱ्याच दिवसात मिळाले नव्हते.

'हा गेला कुठे?' त्याचे मास दूर ठेवीत ती म्हणाली.

काही वेळाने तो आला. टालास्कारने त्याला त्याचा तुकडा दिला. त्याने तो हातात घेऊन म्हटले,

'याच्याकरिता तूच मास भाजलेस का?'

'होय मीच!'

'तुला तसे करता येणार नाही! त्याला दुसरीकडे जायला सांग.'

'का? तू कोण मला सांगणार? हव तर तूच दुसरीकडे जा.'

त्याने तिच्याकडे डोळे वटारून पाहिले. 'मी न् तू अनेक दिवस एकत्र खातो आहो. त्याला जायला सांग.'

'नाही! तो जाणार नाही!'

तोच त्याने तिच्यावर झडप घेतली. तिला घट्ट धरली आणि तिचे चुंबन घेऊ लागला. ती सुटण्याचा प्रयत्न करू लागली. पण तिचे काही चालेना. तोच त्याच्या मानेवर एक लोखंडी पंजा पडला. त्याने मागे पाहिले तो तो नवा गुलाम. तो चिडला पण.... टारझनने त्याला दूर उडवले. तो दाणकन आदळला. टारझनला नवा शत्रू निर्माण झाला.

'एक दिवस मी तुला ठार मारीन.' तो म्हणाला.

'बरे, बरे! पुढचे पुढे.' टारझन हंसत म्हणाला.

●●●

# बा रा

एक दिवस मी तुला ठार मारीन, असे म्हणणारा कारफटॅप डुक्कर मुसंडी मारत टारझनच्या अंगावर धावला. टारझनने त्याला पुन्हा ढकलून दिले तेव्हा त्याचा राग अतिरेकाला पोहोचला. हाताने जमेना तेव्हा तो काही. शस्त्रे शोधू लागला; पण तिथे शस्त्र कोठून असणार? तेव्हा त्याने एक शेगडीच उचलली. ते पाहून इतर गुलाम मध्ये पडले.

'कारफटॅप मारामारी करायची तर न्यायाने कर. मूर्खा! शेगडी उचलतोस! आणि इकडले कायदे तुला माहित नाहीत? ठेव ती खाली.' पण कारफटॅपच्या रागाला सीमा नव्हती. तेव्हा ती एका गुलामाने ओढून घेतली. आणि कारफटॅपची नजर वर गेली.

टारझन ऑप दी एप हसत होता.

ते पाहून तो फार भडकला. आणि पुन्हा टारझनच्या अंगावर धावला आणि त्याच वेळी कालफास्टोब्रान तिथे आला. तो सहज तेथून फेरी मारीत होती. तेव्हा त्याची नजर त्या दोघावर पडली आणि तो तावातावाने आत आला. त्याने टारझनला पाहिले. 'झौनथ्रोल! हा राक्षस! आपल्या बळाचा दिमाख दाखवीत आहे! आणि हा कोण? कारफटॅप?'



हाताने जमेना, तेव्हां त्याने एक शेगडीच उचलली. ते पाहून इतर गुलाम मध्ये पडले.

कारफटॅप त्याचा फार लाडका होता. तो टारझनवर संतापला आणि म्हणाला, ' मी तुला आठवण राहील अशी शिक्षा करीन.'

तेव्हा टालास्कार पुढे सरली आणि म्हणाली,

' झोनथोलचा काही अपराध नाही. त्याने आत्मरक्षणाकरिता हात उचलला. कारफटॅपने त्याची खोडी केली.'

या वेळी कालफास्टोबान तिच्याकडे निरखून पहात होता.

' तुझे वय काय ?' त्याने विचारले.

तिने भीत भीत त्याला सांगितले.

' मी तुला विकत घेणार आहे.' आणि दुसऱ्या गुलामांना तो म्हणाला.

' कोणी तिच्या वाटेस जाऊ नका.'

आणि टारझनला घेऊन तो निघाला. अर्ध्या रस्त्यावर त्याचा बेत फिरला. त्याने त्याला सांगितले,

' एक वेळ मी तुला सोडतों. पुन्हा सापडलास तर शंभर फटके मिळतील.'

टारझन, जंगलचा राजा गप्प परत आला. हे मोकळे रान नव्हते. प्रतिकार करण्याचे त्याच्यात सामर्थ्य नव्हते असे नाही पण तो जास्त जखडला होता. सर्व त्याचीच वाट पहात होते. टालस्कार बेचैन झाली होती.

इतक्यात तो आला आणि तो आपल्या जागी जाणार तो त्याच्या कानी शब्द आले. ' टारझन ! टार ऽऽ...'

टारझन चमकला. त्याने बाजूला पाहिले.

' कॉम !' तो ओरडला.

कॉमने-कोमोडोक्लोरेनसाल थ्रोहानाडोलमाकस्च्या राजपुत्राने त्याच्या तोंडावर हात ठेवला, ' थांब, इथे नाही.'

'इथे मी ओपोनाटो किंवा ८००$^{3}$+१९ आहे.'

'म्हणजे तो तू? टालास्काराने मला सांगितले पण तुझी कल्पना कशी येणार. पण तुला....पण.'

कॉमने पुन्हा तोंडावर बोट ठेवले.

'पण तुझी उंची? आता तू माझ्या इतकाच आहेस. तू इतका मोठा कसा झालास? काय ही जादू! मला काही कळत नाही. बरेच दिवस मी विचार करतोय. तुमच्याशी लढायला आले ते तुमच्यासारखे बुटके लोक व्हेलटोपटीसीमॅकोसियन्. आणि ही तर माझ्या उंचीची माणसे! पण त्यांच्या बोलण्यावरून माझी खात्री झाली की ते व्हेलटोपटीसीमॅकेसियन आहेत; पण त्यांची उंची! हे काय रहस्य?

कोमोडोक्लोरेनसाल हसला आणि म्हणाला, 'टारझन! ही जादू नाही आणि रहस्यहि नाहीं. हा एक शास्त्रीय चमत्कार आहे.'

'म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का या तुमच्या चमत्कारामुळे मी तुमच्या आकाराचा झालो, अगदी अठरा इंच उंच?'

कॉम हंसला आणि म्हणाला. यावेळी टारझनने आपल्या कपाळाला आठी घातली होती- 'पण महाराज तसे होण्यापेक्षा या शोधाने सर्व माणसे, त्यांची सर्व शस्त्रे, त्यांच्या सर्व वस्तु, त्यांची घरे त्यांच्या खाणी रस्ते वगैरे वगैरे आकाराने वाढल्या आहेत. असे का म्हणू नये?'

'पण मी तुला सांगतो. ते अशक्य आहे.' टारझन म्हणाला.

'बाबारे मलासुद्धां तुझ्यासारखेंच आश्चर्य वाटत होते. पण जवळ जवळ दोन महिने झाले मी हे प्रत्यक्ष पाहात आहे. आणि तुझ्या-बद्दल मी ऐकले होते की तुला आमच्यासारखा बुटका या लोकांनी केला आहे आणि ते मला तुला इथे प्रत्यक्ष पाहीपर्यंत खोटे वाटत होते पण तुला पाहताच आता कळतेय की ते खरे आहे.'

'पण ते त्यांना कसे शक्य झाले. त्यांनी ते कसे केले?'

'व्हेलटोपटीसमाकसमध्ये एक मोठा बुद्धिमान, विचारी, शास्त्रज्ञ माणूस आहे. त्याचे नाव जोहानथ्रोहागो.' राजपुत्र म्हणाला. 'आम्ही या गोष्टी प्रसंगानुसार ऐकत होतो. पूर्वीपासून आमच्या या दोन शहरात मालाची व कधी कधी विचारांची देवघेव होते. त्यामुळे या माणसांच्या चमत्काराविषयी आम्हाला थोडी कल्पना होती.'

'तुमच्या मिनुमींमध्ये असा एखादा जादुगार आहे असे मी कधीच ऐकले नव्हते.' 'टारझन म्हणाला, 'हे चमत्कार म्हणजे जादुगिरी असे मला वाटते. आमच्या इंग्रजीमध्ये एक चमत्कार करणारा शास्त्रज्ञ असतो. तसाच हा शास्त्रज्ञ का?'

'तसा नाहीं! बरे ते जाऊ दे! पण तुला कोणी पकडले ठाऊक आहे? जोहानथ्रोहागोने. तू बेशुद्ध होऊन पडलास पण त्याने तुला बेशुद्ध असताना बांधले, तुझ्या आकाराची झाडांच्या फांद्यांची पालखी केली तिच्यावर तुला बांधले आणि आमच्या वीस काळविटांनी ती पालखी इथपर्यंत वाहून आणली.'

'जोहानथ्रोहागोने बरेच शोध लावले आहेत. त्याच्या शोधामुळे त्याने बऱ्याचशा प्राण्यांचा आकार लहान केला पण ते पशू आहेत. इथे आणल्यावर त्याने तुझ्यावर तो प्रयोग करायला सुरुवात केली. त्याने स्वतः तयार केलेले एक यंत्र त्याच्याजवळ आहे. त्याने वस्तूचा वा माणसाचा आकार लहान करता येतो; पण वाढवता येत नाही.'

'म्हणजे आता माझ्या त्या जंगलात किंवा माझ्या देशात माझा निभाव कसा लागणार?

'मित्रा! तू दुःखी होऊ नकोस. आपणाला इथून सुटण्याची आशाच नाही.'

'का?'

'कारण आपण उघड्या जगात नाही. खाणीतील बिळात आहोत आणि पहारे असे आहेत की त्यांना चुकवून जाणे शक्य नाही.'

'बरे! एक सांग त्याला आकार कमी करता येतो पण वाढवता येत नाही का?'

'नाही! तसे असते तर सर्व व्हेलटॉपटीस मॅकेसियनसाना त्याने आकाराने मोठे केले असते आणि जग जिंकण्याची त्याने महत्त्वाकांक्षा धरली असती. पण तो प्रयोग करतो आहे आणि त्याने उलट गोष्टी घडत आहेत.'

'पण आपणाला सुटून जाण्याची संधि का मिळणार नाही?' टारझन म्हणाला.

'कारण बाहेर जे गुलाम फिरतात ते सारे पांढऱ्या कुडत्यातले. लढाईच्या वेळी जे पकडले जातात ते सारे पांढरे कुडतेवाले. हिरव्या कुडत्यातला एखादाच कधी बाहेरच्या जगात जातो आणि अशी संधि आयुष्यात एकाद वेळच मिळायची. तेव्हा म्हणतो आशा कमीच.' कॉम म्हणाला. 'पण तूं पकडला गेलास याचे मला दुःख होते आणि थोडा आनंद पण होतो. एक मित्र तरी जवळ आहे. आता आपण तिघे झालो.'

नंतर त्याचे लक्ष कोपऱ्यात बसून राक्षसी नजरेने आपणाकडे पाहणाऱ्या कारॉफटॅपकडे गेले.

'पण तो तुझ्याशी का भांडला टारझन?'

'तो मला त्रास देऊ लागला; तेव्हा हे मध्ये पडले. तेव्हा तो त्यांच्यावर उलटला.'

'अस्से! मला वाईट वाटते. त्यावेळी तुझे संरक्षण करायला मी इथे नव्हतो.' तो तिच्याकडे पाहून बोलत होता आणि तिने मान खाली घातली. तिच्या गालावर लाली आली. पण टारझनच्या नजरेतून ती सुटली नाहीं. तो तिचे रहस्य समजला.

मग ते बराच वेळ गप्पा करीत बसले होते. दुसरेहि काही गुलाम येऊन त्यांच्यात बसले. त्यांना झौनथ्रोलबद्दल आदर वाटू लागला होता. कारफटॅपबद्दल त्यांना तिरस्कार वाटे. कारण तो अरेरावी होता. नंतर टारझन झौनथ्रोलने कोमोडोक्लोरेनसालला विचारले, 'आता झोपण्याची काय व्यवस्था.'

'ती पहा!' जमिनीवर झोपलेल्या अनेक गुलामांकडे बोट दाखवून कोमोडोक्लोरेनसाल म्हणाला.

'असे काय ?'

नंतर टारझन म्हणाला, 'हे दिवे विझल्याशिवाय मी झोपणार नाही.'

'मग तुला कधीच झोपता येणार नाही.'

'का ?'

'कारण हे दिवे कधीच विझणार नाहीत. आणि ते विझले तर आपण जगणार नाही.'

'एक एक विचित्र बोलतोस!' टारझन.

'अरे हें विज्ञान आहे! येथे जे घाण वायु जमतात ते ते दिवे शोषून घेतात. रात्री हे दिवे ऑक्सीजन बाहेर टाकतात व घाण ओढून घेतात.'

'मग मला आताच झोपले पाहिजे!'

आणि त्याने जमिनीवर आपले शरीर पसरले.

इंग्लंडचा लार्ड ग्रेस्टोक, उच्च दर्जाचा सरदार आज एका खाणीतल्या भुयारात जमिनीवर झोपला होता.

●●●

# ते रा

**सकाळी** कॉम आणि टारझन उठले तेव्हा टालास्कर त्यांची न्याहारी तयार करीत होती. न्याहारी संपताच कामाची वेळ होईपर्यंत ते आपण कसे सुटावे? आपणाला सुटण्याची संधि मिळेल का याची चर्चा करू लागले.

'कोमोडोक्लोरनसाल व टालास्कर या दोघांचे असे मत होते की आपणाला तशी संधि नाही. कारण ते आपणाला कधीच वर नेणार नाहीत. पण तसे स्वस्थ बसून चालणार नाही. काहीतरी मार्ग शोधून काढला पाहिजे.'

'पण कसा काढणार?'

'तेच मी ठरवतोय. काल तू दिसल्यापासून विचार करतोय'

'मला वाटते आपणाला एकत्र काम करण्याची संधि मिळाली. पाहिजे. पण टालास्करला इथे ठेवली तर तिची वाट काय?'

'मला पण सोडवा. कालाफास्टोबान मला विकत घेणार आहे तेव्हा माझ्यापुढे ते एक संकट उभे आहे. मला तुमच्याबरोबर ठेवा.' ती काकुळतीने म्हणाली.

टारझन म्हणाला, 'तसेच करावे लागेल.'

'पण कसे? तिचा जो धनी आहे तो दरवर्षी एक दोन गुलाम

विकतोच व हिचा धनी गुलाम विकून कर भरतो तेव्हा हिच्या बाबतीत काम जरा कठीणच आहे. पण त्यालाहि काही युक्ती मी काढीन.' कोमोडोक्लोरेनसाल म्हणाला.

इतक्यात कामावर जाण्याची घंटा झाली. वेगवेगळ्या व्हरांड्यातून गुलामांच्या टोळ्याच्या टोळ्या निघून आपल्या मार्गाला लागल्या होत्या. टारझन व कॉम थोडे मागे होते. थोडी गर्दी कमी होताच ते निघाले व अठराव्या मार्गावर आले. तेथून अडतिसाव्या मार्गावर विभक्त झाले. टारझन इमारती लाकडे नेण्याच्या कामावर होता.

टारझन जेव्हा तिकडे पोहोचला तेव्हा कालाफास्टोबान याने त्याच्याकडे निरखून पाहिले. काराफटपने जळजळीत डोळ्यांनी पाहिले. टारझन तोंड फिरवून फक्त हसला.

दुपारपर्यंत त्यांचे काम झाले आणि चार वीर तिथे अचानक आले. टारझनने त्यांच्याकडे पाहिले नाही की त्यांची पर्वा केली नाही. तो आपले काम करीतच होता आणि खरे सांगायचे म्हणजे कालाफास्टोबन त्याच्या कामावर खुष होता. त्याच्या कामात एक प्रकारची शिस्त व चपळाई होती.

ते अधिकारी काही वेळ आपसात चर्चा करीत होते. मग एका अधिकाऱ्याने कालाफस्टोबानला एक चिठी दिली. ती वाचताच त्याला भीती वाटली आणि नवल पण वाटले. भीती अशासाठी की आता आपण हा गुलाम गमावणार आणि नवल अशासाठी की जोहान थ्रोहा हागो शहरातील सन्मान्य माणूस त्याने त्याला आजच का बोलवावे ?

पण तो हुकुमाचा ताबेदार होता. त्याने टारझनला हाक मारली, ' झौनथ्रोल ! '

टारझननें मागें पाहिलं. त्या चौघात कोमोलोक्लोरेनसाल होता.

' तुला जौहानथ्रोहागोने बोलवले आहे.तू यांच्याबरोबर जा. टारझनने

कॉमकडे पाहिले. दोघांची नजरानजर होताच टारझन समजला. नंतर टारझनला त्यांच्याबरोबर जाण्याची परवानगी मिळाली. पण आता कॉमच काय ? पण कॉमने त्या अधिकाऱ्याला नम्रपणे विनंति केली,

' मला याच्याबरोबर जाऊ द्या. माणूस कामात कितीहि हुशार असला तरी भाषेमुळेच आपणाला त्याला त्याचे काम समजावून देता येत व आपला फायदा होतो. '

' ते खरे आहे; पण तू बोल बरे त्याच्याबरोबर त्याच्या भाषेत. '

आता मोठी पंचाईत आली. भाषाच नाहीतर बोलणार काय ?

कॉमला विचार पडला. पण डरणारा माणूस तो नव्हता. काहीतरी वेडीवाकडी मुळाक्षर त्याने उच्चारली आणि टारझनने एकदा मान हलवली. पुन्हा कॉम काहीतरी बडबडला आणि टारझनने इंग्रजीमध्ये सुरवात केली. पण ती एक गंमतच होती.

' जौहनथ्रोहागोने मला बोलावला आहे पण मला बोलावण्याचा त्याला काय अधिकार ? मी मी त्याला लंबा करीन. त्याची मान पिळीन. तो राजा, हा कालाफाल्टोवान तो जौहानथ्रोहागो सारे लुच्चे आहेत. साऱ्यांना मी ठार मारीन. आम्हाला गुलाम म्हणून विकतात. '

टारझनची ती इंग्रजीमधून होणारी बडबड ऐकून कॉम थक्क झाला. त्याला हसू पण येत होत आणि ते दाबता दाबता त्याला नाकी नव येत होते. शेवटी कॉम त्या अधिकाऱ्यांना म्हणला,

' झौहानथ्रोल माझ्याबरोबर यायला, माझ्या संगतीत राहायला तयार आहे. '

त्या अधिकाऱ्यांनी थोडा वेळ काहीतरी विचार केला व म्हटले,

' ह्याला जौहानथ्रोहागोने बोलावले आहे. तू त्याच्याबरोबरच रहा म्हणजे जौहानथ्रोहागोचे काम सोपे होईल. '

ते ऐकून दोघांनाहि आनंद झाला.

नंतर त्या दोन अधिकाऱ्यांबरोबर ते निघाले. त्या दोन अधिकाऱ्यांच्या हातात दोन उघड्या तलवारी होत्या. आता व्हरांड्यात, गॅलऱ्यात कोणीच नव्हते. तेव्हा त्यांचा प्रवास जलद होत होता. थोड्याच वेळात ते एका वर्तुळाकार जिन्याजवळ आले आणि असे दोन जिने चढून ते खाणीच्या तोंडाशी आले आणि टारझनला मनस्वी आनंद झाला.

सूर्यप्रकाश ! त्याने तो आनंदाने अंगावर घेतला. हुंगला. टारझन-सारख्या उघड्या, मोकळ्या रानात सर्व आयुष्य घालविलेल्या माणसाला खाणीतले राहणे किती भयंकर ? एकाच दिवसात तो कंटाळला होता, तीच स्थिती कॉमची झाली होती. अहाहा ! ‘ सूर्यप्रकाश ! सूर्यप्रकाश !’

रस्त्याने जाताना त्यांना अनेक दृश्ये दिसली. इतक्यात ते राजवाड्याच्या डोममध्ये शिरले. ते मागच्या दाराने आत शिरले. हे दार पश्चिमेकडे होते. समोरच्या मैदानात हजारो सैनिकांची कवाईत चालली होती. ते आत शिरले व एक वर्तुळाकार जिना चढून वर आले, त्यांना व्हरांड्यांतून जात असता ती कवाईत दिसत होती. त्यात काही पायदळ व काही घोडेस्वार होते. ते पुढे मागे सरकत तेव्हा जणू पाण्याच्या लाटा सरकताहेत असे वाटे.

एकदा तर एक विलक्षण देखावा टारझनला दिसला. दोन घोडे-स्वारांच्या रांगा एकमेकांना भिडल्या. इतक्या जवळ की टारझनला वाटले काही माणसे व काही घोडे ( काळवीट ) आता एकमेकांवर आपटून चिरडणार; पण डोळ्याचे पाते लवते न लवते तो एक रांग दुसऱ्या रांगेवरून अलगद उडी मारून गेली. कोणालाही धक्का लागला नाही. एकाच वेळी एकाच क्षणात असा प्रकार. इतके चातुर्य इतकी चपळाई टारझनने आपल्या आयुष्यात कधीच पाहिली नव्हती. अगदी इंग्लंड, फ्रान्स सारख्या देशातहि !

अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक ........

‘कॉम! हे चातुर्य, अशी चपळाई मी कधीच पाहिली नव्हती. तुमच्या सैन्याची पण.’

‘आमच्या सैन्याचे तू काय पाहिले आहेस? आमच्या कवाईती अशा राजवाड्यासमोर होत नाहीत. त्या आमच्या शेतीच्या, मळ्यांच्या मैदानात होतात. त्यात गुप्तता राखली जाते. कवाईत कधी असते हे कोणाला माहित नसते. माझ्या, वडिलांना राजे अँडेनड्रोहाकीन-थ्रोहाना-डोलमाक्सचे महाराज यांना असे प्रकार आवडत नाहीत. आमची कवाईत काही बाबतीत यांच्यापेक्षा चांगली होते. पण तू ती पाहिली नाहीस. एकदा मी ती तुला दाखविणार होतो.’

‘मग तुमचा पराभव त्यांनी केला हे कसे?’

‘त्याचे कारण आमच्या पायदळाला या युद्धात संधि मिळाली नाही. बाहेरच युद्धकैदी घेऊन त्यांनी पळ काढला.’

इतक्यात त्यांच्यापैकी एक अधिकारी मागे येऊन रागाने म्हणाला,

‘त्याला तुझी भाषा येत नाही ना? मग इतका वेळ काय बोलता?’

कॉम दचकला. त्याला उतर सुचेना. खरेच ते फार वेळ बोलत होते. पण याला आता उत्तर काय देणार? याने आपले बोलणे ऐकले असले तर?

तरी पण तो धीर करून म्हणाला,

‘मी त्याला मिनुमीच लोकांची भाषा शिकवीत होतो. तो म्हणाला मला तुमची भाषा शिकव तेव्हा मी प्रयत्न करीत होतो.’

‘मग तो आपली भाषा शिकतोय का?’

‘होय! शिकतोय. प्रयत्न करतोय; पण अगदी बुद्दु डोक्याचा आहे.’

‘बरे बरे! शिकव त्याला!’ आणि तो अधिकारी पुढे निघाला.

नंतर ते अगदी न बोलता चालू लागले आणि टारझन हळुच

गाला, ' त्यांचे रस्ते त्यांची झाडे, त्यांच्या फुलबागा किती छान
होत्या ? '

“ दोन [illegible] त्यांनी या बागा केल्या आहेत म्हणून यांच्या शहरात सौंदर्य वाढले आहे.”

' होय ! सौंदर्य वाढले आहे पण याने शत्रुवर वेगळाच परिणाम होतोय. हे वैभव दाखविण्यात काय अर्थ ? आम्हाला पण बागा, फळझाडे, फुलझाडे आवडतात. पण आमच्या बागा, फळझाडे, फुलझाडे आमच्या शेतीच्या आसपास आहेत. '

' आणि मला हे लोक निर्बुद्ध वाटतात. कवाईत राजवाड्यासमोर कशाला ? बायकांना पहायला ? '

' आणि यांची राजकीय परिस्थिति तुला वाटते तितकी चांगली नाही. यांचा राजा निर्बुद्ध, अहंकारी आणि उथळ मनाचा आहे. '

इतक्यात त्या अधिकाऱ्याने मागे पाहिले आणि कॉम गप्प राहिला. त्याला वाटले हे होतेय ते अधिक होतेय. थोड्याच वेळात ते दुसऱ्या एका जिन्याशी आले.

तेथे त्यांना अनेक खोल्या लागल्या. त्यात अनेक भागांवर अनेक कारागीर काम करीत होते. कुणी सोन्या-चांदीचे सुबक अलंकार तयार करीत होते. कुणी चांदीची अथवा इतर धातूंची भांडी घडवीत होते. पण मेणबत्त्यांचे काम मोठ्या प्रमाणावर होत होते.

नंतर ते एका शृंगारलेल्या दालनाकडे गेले. तिथे दाराशी एक मंत्री उभा होता. टारझनबरोबर आलेल्या अधिकाऱ्याने त्याला काही सांगितले. त्याने घंटी वाजवली नंतर एक पहारेकरी बाहेर आला. त्याच्याबरोबर त्याने आत निरोप पाठविला आणि ते थांबले.

थोड्या वेळाने तो पहारेकरी व एक अधिकारी आले. त्याने झौनथॉल आणि कोमोडीक्लोरेनसॉलला आपल्याबरोबर आत नेले. आणि तो जौहानथ्रोहागला वर्दी देण्यासाठी वळला.

जौहानथ्रोहागो त्याला म्हणाला, 'गुलामांना आत आण.' ते आत येताच तो म्हणाला, 'दोन गुलाम? मी एकाला म्हणजे जौहानथ्रोलला बोलावले होते.' 'पण हा दुसरा आहे. त्याला याची भाषा समजते. तो दुभाषाचे काम करील म्हणून त्याला आणलाय. त्याने आपले काम सोपे होईल.'

नंतर कोमोडोलोरेनसालकडे वळून राजपुरुष म्हणाला, 'त्याला विचार की त्याचा आकार लहान केल्यापासून त्याला बरे वाटत आहे का?'

नंतर कोमोडोक्लोरेनसालने त्याला आपल्या काल्पनिक भाषेत विचारले, अर्थातच टारझनला ती त्याची भाषा येत होती.

म्हणून त्याने इंग्रजीत काही शब्द उच्चारले कारण ढोंग करायचे तर पुरे केले पाहिजे.

कॉम त्याला काही म्हणाला, 'त्याला बरे वाटत नाही. तो विचारतो आहे की मला पूर्वीचा आकार कधी द्याल, व जाण्याची परवानगी कधी द्याल?

'त्याला सांग की मिनुलीला—ज्याला युद्धातून धरून आणून गुलाम केले. आहे. त्याला स्वदेशाला जायला कधीच परवानगी मिळत नाही.'

'पण तो जोहानझल मॅकेसियन नाहीं आणि तो आमच्याकडे आमचा पाहुणा म्हणून आला होता. माझ्या वडिलांनी—ॲडेनड्रोहोकीन महाराजांनीं जोहानझाल माकसच्या राजाने त्याला सन्मानाने वागवलं—मित्र म्हणून वागवलं आहे.'

'मला ठाऊक आहे तो मिनुनीयन आहे. तूं अधिक बोलूं नकोस.'

'तसे नाही महाराज तो मिनुनीयम नाही. त्याचा देश येथून फार दूर आहे. त्याच्या देशांतील माणसे त्याच्यासारखीच उंच व सुदृढ आहेत.'

'अहं ! तो झेरटोलाकोलाल आहे. कदाचित् त्यांच्यापेक्षा वेगळाहि असेल. असेल कुठल्या दुसऱ्या देशाचा? पण झेरटोलाकोलालच.'

कोमोडी क्लोरनसाल निराश झाळा. आता काय करणार ?

इतक्यांत घंटी वाजली. घंटेचे पांच टोल थ्रोहागोने मोजले व त्याला समजले की महाराज दूकोमोएल हागोस या झौनथ्रालला भेटू इच्छितात. त्याने पहारेकऱ्याला सांगितले त्यांना शेजारच्या खोलीत घेऊन जा.

टारझन व कॉम आणि त्यांच्या मागोमाग जौहानथ्रोहागो त्या खोलीत गेले आणि उभे राहिले.

राजा येण्याची ललकारी झाली. दुसऱ्या दाराने राजे आत आले. सर्व उभे राहिले. सर्वांनीं राजापुढे गुडघे टेकले आणि राजाने सांगताच ते उठून उभे राहिले. आपल्या जागेवर कोणी बसले, कोणी उभे राहिले.

कोमोडोक्लोरेनसालने राजापुढे गुडघे टेकले राजाने सांगताच. तो उभा राहिला; पण टारझन तसाच उभा राहिला. त्याच्या तोंडावर पण नम्रतेचा भाव नव्हता. एक प्रकारचा या निर्बुद्ध राजाबद्दल वाटणारा तिरस्कारच दिसत होता.

राजाने झौहानथ्रोहागोला ते दाखवले. त्याने त्याला खूण केली पण काहीच उपयोग झाला नाही.

दुसरा कोणी असता तर राजाने त्याला मरणाची शिक्षा फरमावली असती. पण टारझनच्या बाबतीत तो तसे करू शकत नव्हता. त्याला प्रयोगाकरिता त्याचा उपयोग करावयाचा होता म्हणून त्याने आपला राग आवरला. नाहीतर भलताच परिणाम झाला असता.

पण त्याने जाण्यापूर्वी इतराना एक सूचना दिली.

'पुन्हा माझ्यासमोर आणताना त्याला नीट शिकवून आणा.' आणि तो गेला.

कॉम मनांत म्हणाला, 'एक संकट टळले. पण पुढे काय?' ●●●

# चौदा

**टारझन** सर्वजण गेल्यावर त्या खोलींत एकटा होता. नंतर त्या खोलींत इकोमोएलहागो आणि जौहानथ्रोहागो पुन्हा आले आणि खुर्चीवर बसून एकमेकाशी बोलू लागले.

'तुझी खात्री आहे का त्याला आपली भाषा समजत नाही ?' राजा म्हणाला,

'हो ! '

'पण त्याच्या चेहेऱ्यावरून तसे दिसत नाही !'

'बरे, पण आपण आता त्या प्रयोगाबद्दल बोलू; आपण तो प्रयोग करायचा काय जौहानथ्रोहागोवर ?

'होय, पण सर्वांना आता बाहेर घालवा ?'

सर्व बाहेर गेल्यावरही जौहानथ्रोहागोला विचार पडला की हा निर्बुद्ध राजा विज्ञानांतील माझे सर्व प्रयोग आपल्या नावावर चढवून घ्यायला पहात आहे, तेव्हा काय करावे ? पण मध्येच राजाने त्याला विचारले,

'आकार तुला लहान करता येतो; पण तो अत्यंत वाढवता येईल काय ?'

'तोच प्रयोग आता करायचा आहे. पण तो प्रयोग करण्यापूर्वी माझी एक मागणी आहे. ती महाराज पुरी करतील काय ?'

राजा हे ऐकून मनात घाबरला पण तो उघड म्हणाला,

'तुझी मागणी पुरी करायची नाही तर कोणाची? तू तर आमचा उजवा हात!'

'मग माझी अशी विनंति आहे की मला आपल्या कौन्सिलवर घ्यावे?' जौहानथ्रोहागो म्हणाला.

'कौन्सिलवर घ्यावं? पण कौन्सिलवर जागा कुठे आहे? जागा होईल तेव्हा तुला अवश्य घेईन.' राजाने उत्तर दिले.

'पण महाराज! आपण इतके समर्थ आहांत की आपणाला एखादी जागा बदल करून मला देता येईल किंवा नवी जागा उत्पन्न करता येईल.'

आता मात्र राजाला नकार देता येईना. कारण नवी जागा उत्पन्न करणे आपल्या आटोक्याबाहेरच आहे असे म्हटले तर आपणाला कमी-पणा येतो. तेव्हा तो म्हणाला,

'बरे असे करतो. आजच मी तुझी कौन्सिलर म्हणून नेमणूक करतो. जेव्हा एखादा कौन्सिलर गैरहजर असेल तेव्हा तू कौन्सिल-मध्ये यायचे.'

जोहानथ्रोहागोने ते कबूल केले. दगडापेक्षा वीट मऊ. त्याचे वजन सर्वत्र इतके होते की इतर कौन्सिलर त्याला जागा देण्याकरिता सह-जच गैरहजर राहिले असते व त्याला जागा मिळती.

त्याला कौन्सिलमध्ये इतक्याकरताच जागा हवी होती की राजाने एखादा शोध आपण लावला म्हणून बढाई मारायला नको. सहजा-सहजी तो एखादा शोध आपल्या नांवावर दडपून नेईल; पण त्याला तसे करता आले नसते. केव्हा? तो स्वतः कौन्सिलमध्ये असता तर. पण असे जरी होते तरी या लोकांचा राजावर—जरी तो आपणाळा थागोस्टो

( सर्वसमर्थ ) म्हणवीत होता तरी विश्वास नव्हता. या सर्व शोधांचा पिता वा जनक जौहानथ्रोहागो आहे हे ते जाणून होते.

हे सर्व ठरल्यावर राजा म्हणाला,

'आता तुझा प्रयोग पाहूं या. मला तो दाखव !'

'बरे' म्हणून जौहानथ्रोहागो आपली सर्व उपकरणे काढूं लागला. तेव्हा आपले ज्ञान दाखविण्याकरिता राजा म्हणाला,

'पण प्रथम मला तुझा तो प्रयोग सांग म्हणजे मी पाहातो.'

'अरे चोरा ! प्रयोग सांगू काय ?' पण तो उघड म्हणाला,

'महाराज ! तो प्रयोग आपल्या पुढ्यांत झाला होता.'

'मी या झौनथ्रोलचा व इतर काही प्राण्यांचा आकार कमी केला, तेव्हा आपण होतां !'

पण तेच सांग कसे ते !'

'प्रथम आकार कमी करताना त्याच्या डोक्याच्या मागचा भाग आहे त्याच्यावर हळू हळू ठोकतो. लहान प्राण्याच्या बाबतींत ते शक्य आहे. पण मोठ्या प्राण्याच्या बाबतींत करायला कठीण जाते. पण आता ते मी करणार नाही.'

'मग काय करणार ?' राजा.

'आता मला लहान आकाराचे प्राणी मोठे करायला हवेत. आपले मिनुनियस आकाराने फार लहान असल्यामुळे लढाईवर जाताना आपणांस हजारोनी, लाखोनी सैनिक न्यावे लागतात. पण माझा प्रयोग जर यशस्वी झाला तर लढाईवर जाताना थोडे लोक न्यावे लागतील. शत्रूंचा धुव्वा उडवता येईल आणि उरलेले नेहमीप्रमाणे आपले काम करतील.'

'बरे आणखी एक करता येईल. युद्ध संपले की त्यांना पूर्वीचा आकार देता येईल.'

हे ऐकून टारझन म्हणाला, 'किती दुष्ट आहेत हे लोक?' या दुष्टानी माझी अशी स्थिती केली आहे. कसा मी पूर्वीसारखा होणार?'

'बरे मग तू या प्रयोगाला सुरुवात करतोस ना?'

आणि त्याने आपली प्रयोगाची साधने बाहेर काढली. ती नीट व्यवस्थित बसवली आणि नंतर त्याने एक रोडंट (दाताळ प्राणी) उंदरासारखा बाहेर काढला. त्याला उताणा पाडला. त्याचे डोके एका वाटोळ्या तबकडीवर ठेवले आणि त्याला गति दिली. आणि मग त्याच्या कपाळावर [त्या प्राण्याच्या] ठोक ठोक सुरू झाली. गति देताच तो प्राणी बेशुद्ध झाला पण त्याचा प्रयोग यशस्वी होईल असे वाटेना पण त्यानी प्रयत्न चालूच ठेवला. ज्यावेळी हा प्रयोग होत होता त्या वेळी टारझन पुढे येऊन हे सारे बारकाईने पहात होता. पण कोणाच्याच हे लक्षात आले नव्हते. आले तेव्हा त्याना थोडी भीतीच वाटली.

मग थोडा वेळ उगाच प्रयोग करून त्यानी तो प्रयोग थांबवला आणि झोनथ्रोल व कोमोडोक्लोरेनसाल यांना त्या खोलीतून न्यावयास सांगितले.

टारझन मात्र मनात घाबरला होता.

'जर यानी उद्या माझ्यावर प्रयोग केला तर हे माझे असेच हाल करतील. यातून सुटकेचा उपाय?' तो विचारमग्न झाला.

'समजा याच्या प्रयोगामुळे मला माझा पूर्वीचा आकार मिळाला–तर? पण प्रयोग निष्फळ झाला तर! मग उगाच जीवाचे हाल. या क्रूर लोकाना दयामाया काही नाही.'

आणि मग त्याला त्यांचे एक वाक्य आठवले.

'कदाचित तेहतीस चंद्र पालटले की त्याचा आकार त्याला मिळेल.'

प्रत्येक महिन्यात एकच पक्ष शुक्लपक्ष असतो. तेहतीस चंद्र, शुक्ल पक्ष म्हणजे तेहतीस महिने. पावणे तीन वर्ष! बापरे!

मिनुनीयनस चंद्रावरून महिने मोजतात.

●●●

# पं ध रा

**टारझनला** आणि कॉमला (राजपुत्र) त्यांनी त्याच मजल्यावरच्या एका खोलींत आणून ठेवले. 'आपण कैदी आहोत की काय ? कारण त्यांनी जातांना बाहेरचे दार बाहेरून लावून घेतले होते आणि आत मेणबत्ती पण नव्हती. आत थोडा प्रकाश होता पण अंधुक होता. तो सूर्यप्रकाश आहे हे मागून त्यांना समजले. ती खोली पण फार मोठी नव्हती. पण त्या खोलीला गजांच्या दोन खिडक्या होत्या. दोन बांक व टेबले होती.

'आता ह्या खोलींत आपण काय करायचे ?' राजपुत्राने विचारले.

'ते मी सांगू ?' टारझन म्हणाला,

'पण मला सांग त्या खोलींत तुम्ही काय केलेत ? तुझा आकार त्यांनी कसा लहान केला हे तुला समजले काय ?' राजपुत्र कॉमं.

'कळलं; पण त्याचा काही फायदा नाही. मला ते प्रयोग समजले आहेत. त्यांच्या एकंदर बोलण्यावरून वाटलं की आकार मोठा करण्याचे त्यांच्या झोनथ्रोलहागोचा हाती नाही. पण माझा आकार पूर्ववत् व्हावयाला कदाचित तेहतीस महिने लागतील, चार महिने लागतील किंवा चार दिवसहि लागतील. पण किती हे कोणाला सांगता येणार नाही. पण मला वाटतं माझा आकार लौकरच पूर्ववत होईल तर बरं.'

'अहं! टारझन तसं बोलू नकोस! जर का तुझा आकार वाढला तर तुला ह्या खोलींतून या कॉरिडरमधून न्यायचं कसं? तुला येथे आणले तेव्हा त्यांचे फार हाल झाले असतील.'

टारझन किंचित हंसला. त्याला मोठ्याने हंसता येत नसे आणि मोठ्याने हसणे त्याला आवडत पण नसे.

'त्यांचे हाल होवोत, पण मला रहायचं नाही. मी इथून जाणार.'

'पण तू जाणार कसा? इतका बळकट पहारा असतांना?'

'तेच पहायचे. पण मी इथे राहणार नाही?'

कॉमला वाटले, याने काही त्याच्या बरोबर अतिप्रसंग केला तर! मग त्याच्या हजारो सशस्त्र सैनिकांपुढे याचं कसं होणार?'

इतक्यात कॉम म्हणाला, 'हे खिडकीचे गज पहा. किती बळकट आहेत.

टारझन त्या गजांजवळ गेला आणि त्याने एक गज वांकवला.

ते पाहून कॉम थक्क झाला व म्हणाला,

'त्यानी तुझा आकार कमी केला पण तुझे बळ त्यांना कमी करता आले नाही हे फार चांगले झाले.'

नंतर टारझनने दुसरा गज वाकवला आणि ते दोन्ही गज उसकटून काढले. आणि तसेच पुन्हा ते सरळ केले व म्हटले,

'समज पळून जाताना शत्रु अंगावर आले तर हे आपले शस्त्र.'

'थक्क केलंस बाबा! पण तरी हे सारे अशक्य आहे. माझा यावर विश्वास नाही.'

'तुझा विश्वास नाही; पण मला आशा वाटते. माणसाने नेहमी आशा करावी. तूं पण तसेच कर. प्रयत्नांती परमेश्वर!'

'तसे मी करीन. पण हे कसे शक्य आहे?'

आता खोलीत अगदी पूर्ण काळोख झाला होता. दोघे अंधारातच

बोलत होते. इतक्यात खोलीचे दार उघडल्याचा आवाज झाला. दार उघडून तीन माणसें आत आली. दोन अधिकारी व एक गुलाम. एका अधिकाऱ्याच्या हातात उजेडाकरिता मेणबत्ती होती. त्या उजेडात त्याना दिसले की एका बादलीसारख्या भांड्यात त्याचे अन्न होते व दोन सुंदर बाटल्यात पाणी होते. आणि हे साहित्य एका गुलामाच्या हातात होते.

ते खाणे तेथे ठेऊन ते जाऊ लागले तेव्हा कॉम जवळच्या अधिकाऱ्याला म्हणाला,

'ती मेणबत्ती आमच्याकरिता ठेवा.'

'तुम्हाला या मेणबत्तीची जरुरी नाही. आजची रात्र अंधारात काढा. उद्या तुम्हाला खाणीत नेण्यात येईल.'

खाणीत नेण्यात येईल, हे ऐकून दोघे दचकले.

तो अधिकारी नंतर खोलीचे दार लावून निघून गेला तेव्हा त्या दोघानी आपले जेवण उरकून घेतले. नंतर टारझन म्हणाला,

'उद्या खाणीत नेणार काय? मग आज रात्रीच आपण येथून गेले पाहिजे. एकदा खाली गेले की चारशे फुट खोलीच्या भुयारांतून जेथे हजारो गुलाम आहेत, अधिकारी आहेत तेथून कसे निसटता येईल? तेव्हा आज रात्रीच गेले पाहिजे. अशी संधि पुन्हा मिळणार नाही.

'पण ह्या बंदोबस्तातून अन् या घुमटातून जाणार कसे?'

'हे घुमट! आपल्या खोलीपर्यंत त्याची किती उंची आहे?'

'असेल पंचवीस फूट.'

नंतर टारझनने त्या गडद अंधारांत खाली पाहिले. खाली अंधार गडद होता. वर तारे चमकत होते आणि तो विचार करीत होता. पंचवीस फुट म्हणजे अंतर मोठे होते.

नंतर टारझन अंधारांतच काही करीत होता. तो काय करीत होता हे कोमोडोक्रोरेनसालला समजत नव्हते. दगडावर हळू हळू ठोकावे असा आवाज येत होता.

'टारझन ! तूं हे काय करतोस ? हा आवाज कसला ?'

टारझनने त्याला गप्प बसावयास सांगितले आणि मग जो आवाज येऊं लागला तो वस्त्रांत घालून कांही ठोकावे तसा.

बराच वेळ टारझनचे हे काम चालले होते. शेवटीं ते संपले व टारझनने विचारले, 'या वीरांना किंवा अधिकाऱ्यांना खाणीत कधी फिरता येते का ?

'येते ! कधी कधी येते; पण त्याला काही कारण लागते.' राजपुत्र.

'बरे ! पांढऱ्या कुडत्यातल्या गुलामाना तिथे स्वतंत्रपणे जाता येते का ?'

'नाही ! पांढऱ्या कुडत्यांतले गुलाम खाणीत कधीच जात नाहीत. त्यांना पाठवीतच नाहीत. पण तूं हे का विचारतोस ?'

'आपण सुटलो तर टालस्कारला सोडवायचे असे मी तिला वचन दिलंय.'

'खरे आहे ते ! आपण येथून सुटणार नाही आणि टालस्कारला आपणाला सोडविता येणार नाही. या असंभाव्य गोष्टीचा विचार करण्यांत काय अर्थ ?' काही वेळ टारझन विचार करीत बसला व मग म्हणाला, 'कॉम ! चल.'

'कुठे ? सांगशील तर खरे.'

'मी सांगेन तिथे.'

'प्रथम या खिडकीतून मी बाहेर जातो. माझ्यामागे तू बाहेर ये. तू बाहेर आलास की तुला खिडकीच्या खाली काही गज मिळतील ते घेऊन ये. पण हे पहा, मी तुला एक विचारतो, हा तो मधला दांडा



त्यानें आपले गज उचलले आणि त्याला समजले कीं या गजांची टोकं वाकवून आंकडे केले आहेत !

आहे ना ? याची टोके बाहेर गेली आहेत त्यावरून उतरण्याचा आपण प्रयत्न केला तर ? '

' आपणाला मोक्ष मिळेल ! पण ह्या गुलामगिरीत राहण्यापेक्षा मृत्यू पुरवला. पण ही गुलामगिरी नको. ' त्या राजपुत्राला हे गुलामाचे आयुष्य कसे परवडणार ? त्याच्या राज्यांत त्याच्या सेवेला दहा गुलाम होते.

' राजपुत्राला त्या दांड्यावरून उतरता येणार नाही हे टारझनला पटले. कालाचा मानसपुत्र वाटेल ते करू शकत होता; पण इतरांना ते कसे शक्य होणार ?

' बरे ! ते गज घेऊन माझ्या मागोमाग ये. ' टारझन त्या खिडकीतून बाहेर आला. त्याने आपले गज उचलले. कोडोमोक्रेनसाल पण बाहेर आला. त्याने आपले गज उचलले आणि त्याला समजले की या गजाची टोके वांकवून त्याचे आंकडे बनवले आहेत. आणि आता त्याच्या त्या ठोकाठोंकीचा अर्थ त्याला कळला आणि त्याच्या शक्तीचे व बुद्धीचे त्याला कौतुक पण वाटले.

ते गज घेऊन ते एका टोकाला आले आणि टारझनने तेथेही एक भोक पाडले आणि ती हुकांची माळ त्याने खालच्या गॅलरीत सोडली आणि कॉमला त्याने म्हटले, ' मी खाली उतरतांच हळुच शिटी मारीन की लागलीच तू खाली ये. '

कॉमने ते कबूल केलं.

टारझन हळू हळू खाली उतरूं लागला पण मन भयाने कांपत होतं. एखादा हूक आपल्या वजनानें कडीतून निसटला तर ? पण तसं काही घडलं नाही. टारझन सुखरूप खालच्या दुसऱ्या गॅलरीत आला आणि त्याने हळूच शीळ घातली. आणि कॉम त्या शिडीवरून उतरून खाली आला. आणि ती हुकांची शिडी काढून घेऊन ते

मागच्या बाजूला गेले. तिथे एक खोलीचे दार होते. त्याला आंतलं कुलूप होतं. टारझनने धक्का मारतांच ते कुलूप निसटलं व दार उघडलं आणि दोघे आंत गेले. आंत त्याना पिण्याच्या उंची दारुची खोकीं आढळली आणि एका बाजूला किमती गालीचे, रुजामे पण आढळले. ते पाहून टारझनला व कॉमला नवल वाटले आणि ते जरा पुढे गेले तर एक उपडा पडलेला माणूस त्यांना दिसला. हा काय प्रकार? तोच तिथं त्यांना रक्त आढळलं. टारझनने त्या वीराला उताणा केलं तर तो मेला होता. नंतर ते दार त्याने उघडलं. आंत थोडा प्रकाश होता. त्या प्रकाशांत खोलीच्या मध्यावर असलेलं एक प्रेत त्याला दिसलं आणि मग निरखून पहातांच भिंतीलगत आणखी सहा प्रेतं दिसली. ती भिंतीच्या बाजूने एका ओळीनें पडली होती.

'हा काय प्रकार? हे कसे मेले?'

●●●

# सोळा

नंतर कोडोमोक्लोरेनसाल थोडा हसला. तेव्हा टारझनने त्याला विचारले, 'हसलास का?' 'हसलो! कारण हे मेलेले नाहीत. दारु पिऊन धुंद झालेत.' 'अस्सं! म्हणजे हे मुडदे नाहीत. त्यांचे काम लोकांना दारू न पिऊ देण्याचे आणि तेच दारू पिऊन पडले आहेत.' आणि टारझन हसला. खरे 'वीर!' आणि मग टारझनने एका बहोश झालेल्या माणसाचे कपडे आपल्या अंगात घातले व आपले हिरवे कुडते त्याच्या अंगात चढवले. कॉमने पण तसेच केले. आता ते व्हेलटोमटीसमॅक्रोसियन वीर बनले. आणि थोड्याच वेळात दार उघडून दोन वीर दारात उभे राहिले आणि त्याना तिथे दोन वीर दिसले. हा काय चमत्कार?

तेव्हा राजपुत्र कॉम एका वीराला म्हणाला, 'दार लावून आत या. एक मौज दाखवतो. दार अगदी घट्ट लावा.'

ते दार लावून आत आले आणि त्याच्या पायाशीच दोन हिरव्या ट्युनिक मधले गुलाम दिसले. आणि त्यांच्या लक्षात सारा प्रकार आला. आणि तलवारी उपसून ते तयार झाले. टारझनने आपला गज पारजला. कॉमने पण पडलेल्या एकाची तलवार घेतली. आणि तो त्या दुसऱ्या वीरावर धावला आणि टारझन आपल्या गजाने लढू लागला. पण तल-

वारी पुढे त्याचे काय चालणार; पण कसेहि झाले तरी टारझन जंगलचा राजा होता. त्याने तलवारीचा वार चुकवून त्याच्या डोक्यात गज हाणला आणि तो वीर जागच्या जागी मरून पडला. आता टारझन कॉमला मदत करायला जाणार तो कॉमने पण दुसरा वीर तलवारीने मारला.

कॉम टारझनला म्हणाला, ' तलवारधारी माणसावरोवर तूं गजाने लढतोस ? फार मोठा अविचार आहे हा टारझन ? '

' खरेच ! तुझ्यासारखीच तलवार उचलायला पाहिजे होती. '

' आता पुढे काय ? ' कॉम टारझनला म्हणाला.

' आता या वेशुद्ध वीरांचे कपडे घालायचे. त्यांची प्रेते हिरव्या-कुडत्यामध्ये गुंडाळायची आणि आपण इथून निघून जायचे.' त्याप्रमाणे त्यांनी केले. त्या प्रेतांची तोंडे कुणी ओळखू नयेत म्हणून छिन्नविच्छिन्न केली आणि टारझनने ती मागच्या चौकात फेकली. ' आता ?' त्याने कॉमला विचारले.

' आता हें पहा ! ' आणि त्याने त्या माणसांजवळील पैशाच्या पिशव्या काढून अर्ध्या टारझनला दिल्या अर्ध्या आपण ठेवल्या. आणि त्यांची शस्त्रास्त्रंहि काढून आपल्या कंबरेला लटकावली व ते निघाले. बाहेरच्या व्हराड्यांत येतांच त्यानी कानोसा घेतला आणि ते पुढे निघाले. तेव्हां कॉम म्हणाला, ' हे पैसे मिळाले हे बरे झाले. आपल्या कार्याला आज बरेच शुभशकुन होत आहेत. पण सुटलो म्हणजे मिळवलं. अनेक खोल्या ओलांडून ते खालच्या दुसऱ्या मजल्यावर आले. पण सर्व शांत होतं. कांही पांढऱ्या कुडत्यातले गुलाम त्यांना भेटत होते. आणि ते यांच्याकडे लक्ष न देतांच जात होते. आणि देण्याचं कारण तरी काय ? तिकडले वीर असेच काही कामानिमित्त फिरत असतात.

नंतर थोड्याच वेळांत ते खालच्या मजल्यावर आले. तेथे काही कुटुंबांची निवासस्थाने होती. पण अजून कुणी उठलं नव्हतं.

इतक्यांत ते एका खोलीशी आले. तेथे अनेक माणसें बसली होती. त्यांच्यात कांही उपरी माणसेंही पण होती.

कॉम म्हणाला, ‘आपण यांच्यात मिसळू. पुढें चल!’

ते आंत गेले. कॉमने एका गुलामाकडून दोन मेणबत्त्या घेतल्या व त्याला एक लहान सोन्याचं नाणं दिलं.

नंतर त्याने टारझनला खूण केली. आणि दोघे भिंतीकडे तोंड करून झोपले. थोड्याच वेळांत सर्व खोली रिकामी झाली. पण हे झोपलेच होते.

साफ उजाडलं, तेव्हा टारझन जागा झाला; आणि त्याने कॉमला उठवलं. कारण फार झोपलं म्हणजे संशयाला कारण. ‘उठ लौकर.’ टारझन म्हणाला.

तो उठतांच त्या दोघांनी खोलीतील गटारासारखी पाणी जाण्याची व्यवस्था होती तेथे तोंडे धुतलीं. हेच पाणी ते शेतांत सोडून त्यावर शेती करीत. तोंड धुऊन ज्या ठिकाणी दुकानें होती त्या भागांत ते आले. तेथे पांढऱ्या कुडत्यांतील गुलाम दुकानदार होते.

दुकानांत सर्व तऱ्हेचा माल होता. संसारोपयोगी वस्तू होत्या आणि काही दुकाने म्हणजे हॉटले होती. एका तशा दुकानाजवळ येताच कॉम म्हणाला ‘जायचें आंत?’

‘चल रे बाबा चल! मला फार भूक लागली आहे.’ टारझन म्हणाला.

मग ते आत गेले व खोलीच्या अगदी टोकाला चटईवर बसले आणि छोटे बाक त्यानी जवळ ओढून घेतले. आपणाला कोणी ओळखू नये ही त्याची मोठी इच्छा. खाणे संपताच कॉमने एक चांदीचे नाणे

काढून दुकानदारापुढे केले. ते पाहताच तो हॉटेल मालक चमकला व म्हणाला,

'महाराज ! हे गरीबाचे हॉटेल आहे. येथे धातुचे किंवा लाकडाचे पैसे लोक देतात. माझ्याकडे तुम्हाला परत द्यायला इतके पैसे कोठले? आणि सहज म्हणून तो म्हणाला, 'पलिकडे ते तीनचार गृहस्थ पाहिलेत का? एक वेळ ते श्रीमंत होते, सोन्याच्या नाण्याचा त्यांचा व्यवहार; पण आज त्याना भरपूर खायलाहि मिळत नाही की कपडा नाही ! आणि आठरा आठरा तास काम करावे लागते. हा इकोगोएलाहागोसच्या कराचा प्रताप. प्रजेला त्याने हैराण केलेय.'

पण हें ऐकायला टारझन व कॉम यांना वेळ नव्हता.

दुकान सोडून ते पुढे गेले तो तेथे फार गर्दी जमली होती. तो व्हरांडा फार लहान होता. काय झालंय हे कळण्यास मार्ग नव्हता. लोक पुढे जाण्याकरिता एकमेकाना ढकलीत होते. टारझन व कॉम तेथेच उभे होते. आणि त्यांना या गर्दीच कारण जवळ जवळ समजले होते आणि ते खरे ठरले. दोन हिरव्या कुडत्यातले गुलाम मेले होते. त्यांचे चेहरे न ओळखण्याइतके ते विद्रुप झाले आहेत. कदाचित पळून जातांना किंवा पडतांना तसे घडले असेल आणि एकाने सांगितले, 'झोरानथोहागाकडे जे गुलाम आणले होते ते हे असावेत कारण ते नाहीसे झाले आहेत. आता तो कोणावर प्रयोग करणार?'

तेव्हा टारझन व कॉम पण गर्दीतून मार्ग काढीत पुढे गेले. रानटी जनावरापुढे म्हणजे दात पडलेल्या म्हाताऱ्या वाघसिंहाकडे त्यांना नेण्याकरिता एका काळवीटावर बांधून घातले होते.

आता त्याना कोणी ओळखणे शक्य नाही. पण हे काय? मेलेली माणसे जनावरापुढे टाकायची? टारझनने विचारले.

'होय! गुलामाना आम्ही अशीच मुठमाती देतो. वरच्या दर्जाच्या लोकाना गाडतो. आता याना शहराच्या वेशीवरल्या जंगलात टाकतील.'

'पण वाघसिंह मेलेली माणसे खातात?'

'मग? अंगातली शक्ति गेली, दात पडले तर काय करतील?'

टारझनचे अंग शहारले.

कॉम म्हणाला, 'बाबा! हे जग असं आहे.'

'आमच्या जगापेक्षा फार फार वेगळे.' टारझन म्हणाला, 'आमच्या जगात कोणीही मृत असो त्याला पुरतील. प्रेताचा अपमान कोण करणार?'

●●●

# स त रा

गुलामाच्या गॅलरीतून बाहेर पडताच कॉमने विचारले, 'आता कुठे?' इकडेतिकडे पहात आपली शस्त्रे चाचपीत टारझन म्हणाला, 'खाणीकडे' 'तुला वेड लागलेय? या परिस्थितीत खाणीकडे जायचे आणि मरण ओढवून घ्यायचे. किती गोंधळ उडालाय पाहिलास ना? तो गुलामांचा मृत्यू!' 'मला सर्व माहित आहे पण टालास्कारला सोडवले पाहिजे. तुझ्यासमोरच मी तिला तसे वचन दिले आहे. तिला तसेच टाकायचें?"

'पण मग तिघांना फुकट मरावे लागेल.'

"मग तू मागे जा. माझे काही झाले तरी मी जाणार. तिला सोडवणार.'

'मग जेथे तू तेथे मी.' त्याच्या खांद्यावर हात ठेवून कॉम म्हणाला.

मग ते सरळ खाणीजवळ आले आणि गुलामाची कामावर जाण्याची घंटा झाली. शेकडो गुलाम खाणीच्या तोंडाशी जमले होते आणि रक्षक जशी नावे घेऊ लागले तसे तसे आत जाऊ लागले. त्यांच्याबरोबर त्यांचे दोन दोन रक्षक जाऊ लागले. शेवटची तुकडी जाऊ लागली आणि तिच्याबरोबर रक्षकाने पाहिले तर चार गार्डस! हे कसे? त्याने त्यांना आडवले व विचारले, 'तुम्ही कोणाचे रक्षक?'

'जोहानथोलहागोने त्याची एक स्त्री गुलाम आणायला आम्हाला पाठवले आहे.' मग त्याने विशेष चौकशी केली नाही आणि दुसऱ्या जिन्यावर कोरार्फरस भेटला आणि तो दचकून उभा राहिला पण तिकडे तो काही करण्यास धजला नाही पण त्याने मनाशी निश्चय केला आताच ही बातमी कालफास्टोबानला पोहोचवायची पण कशी?'

टारझनला व राजपुत्र कॉमला समजून चुकले की त्याने आपणास ओळखले आहे.

टारझन म्हणाला, 'हरकत नाही. तू चल! मी पुढचे पाहातो.'

लौकरच अनेक मार्ग ओलांडीत ते टालास्कारच्या दालनाशी आले. तिथे एक रक्षक उभा होता. त्याला त्यांनी सांगितले, 'आम्ही टालास्कार-करिता जोहानथोलहागोकडून आलो आहो.'

'असे?' पण त्याला काही संशय आला आणि त्याने सांगितले,

'मग तुम्ही दोघे आत जा व तिला घेऊन या.' त्याने दाराला थोडी फट केली. कॉम आत शिरला पण टारझन बाहेरच राहिला.

रक्षक म्हणाला, 'तुम्ही पण आत जा.'

टारझन म्हणाला, 'काही गरज नाही तो तिला घेऊन येईल.'

तेव्हा त्या रक्षकाने तलवार काढली. टारझनला त्याचा डाव समजला होता तो मनात म्हणाला, 'तुझे पण भरलंय तर!' आणि त्याने त्याच्या छातीत तलवार खुपसली. तो खाली पडताच त्याने दार उघडले व कॉम बाहेर आला. 'तिला सकाळी कालफास्टोबानने विकत घेऊन बाहेर नेले. चल आता लौकर. नाहीतर इकडेच अडकून राहू.' कॉम म्हणाला. मग ते घाईघाईने निघाले. कॉम पुढे व टारझन मागे. वाटेत त्यांना अडथळा होईल असे वाटले होते पण कोणीच भेटले नाही. खाणीच्या दारावर त्या रक्षकाने त्यांना अडवले. 'कोण तुम्ही? कुठे चाललात?'

अनुक्रम ... विभाग ...

'आम्ही जौहानथ्रोलहागोची माणसे. त्याची गुलाम टालास्कार हिला नेण्याकरिता आलो होतो. पण कालफास्टोबानने तिला आधीच विकत घेऊन नेले आहे.'

'जौहानथ्रोलहागोला ही गोष्ट माहित असणार तो तुम्हाला कसा पाठवणार?'

'तुमचे पास दाखवा.'

'आमच्याकडे पासेस नाहीत. घाईत त्यांना घ्यायला जमले नाही!'

'अस्से, मग मी त्यांच्याकडे एक माणूस पाठवतो.'

कॉमने पाहिले. काय करावे? त्याने एक सोन्याचे मोठे नाणे त्याच्या हातात कोंबून म्हटले, 'खरोखरच आम्हाला पासेस (परवाने) घ्यायला वेळ मिळाला नाही!'

'बरे बरे काही हरकत नाही.' लाच मिळाल्याने त्याला हर्ष झाला होता.

'बरे, आता एक विचारतो कालफास्टोबान याने ती गुलाम स्त्री नेली. पण तो रहातो कुठे? की तो येथे परत येणार?'

'नाही, तो परत येणार नाही! त्याची नेमणूक कुठे तरी बाहेर झाली असून, राजाच्या इमारतीच्या जवळपास रक्षकांच्या विभागात तो राहतो. तो विभाग गुलामांच्या विभागाशेजारीच आहे.'

नंतर खाणीतून बाहेर सूर्यप्रकाशात येताच त्यांना फार आनंद झाला.

नंतर ते त्या राजवाड्यापाशी आले. आता त्याना कोराफटॅपला चुकवायचे होते. कालफास्टोबानला शोधायचे होते. पण हे सारे अवघड होते.

विचारात त्या परिस्थितीचे निरीक्षण करीत गुलामांच्या विभागापर्यंत ते आले. तिथे त्यांना एक स्त्री गुलाम भेटली. त्यांनी विचारले, तेव्हा ती म्हणाली,

'इथून चार दालने ओलांडून जा. त्याच्या घरात जायला दोन मार्ग आहेत. एक पश्चिमेकडचा आणि दुसरा त्या शेजारच्या घरातून.' ते पुढे गेले. पण त्यांना काही समजेना. इतक्यात त्यांना दुसरा अधिकारी भेटला. त्याला त्यांनी विचारले. त्याने पण त्यांना त्या पहिल्याबाईप्रमाणेच पत्ता दिला. पण तो म्हणाला की 'कालफास्टोबान व हमाडालबान आताच बाहेर गेले असावे येतील ते इतक्यात परत.'

रस्ता अगदी मोकळा होता. कारण जो तो आपल्या कामावर गेला होता. इतक्यात कॉम म्हणाला; 'परवाचे तुझे तलवार फिरवणे पाहून मी थक्क झालो. कुठे शिकलास तूं हे सारे?'

'पश्चिमेकडे फ्रान्स नावाचा आमच्याच सारख्या गोऱ्या लोकांचा देश आहे. तेथील सैन्यातील एक लेफ्टनंट पॉल डी. आरनॉट पट्टीचा तलवारबहाद्दर आहे त्याने मला शिकवले. आज वाचलो हे त्याचे उपकार. पण चल त्या कालफास्टोबानला शोधू.'

नंतर शोधत शोधत ते कालफास्टोबानच्या खोलीत आले. खोली चांगली शृंगारलेली होती. पण खोलीत कोणीच नव्हते.

पण ही टालास्कार कुठे असेल? त्यांनी चोहोबाजूला पाहिले आणि त्यांना दिसले की त्या खोलीत आत दोन दारे आहेत; पण ती दोन्ही बंद आहेत. त्यांनी एका खोलीचे दार लोटले आणि तिथे त्यांना बऱ्याच वस्तु आढळल्या. त्यांची ही स्टोअर रूम आहे. बराच माल साठवला आहे. आणि इतक्यात त्याला हामाडालबानचा आणि कालफास्टोबानचा आवाज ऐकू आला आणि ते गप्प राहिले. इतक्यात त्यांना कोणाची तरी चाहूल लागली आणि ते एकदम स्टोअर रूममध्ये शिरले आणि त्यांनी दार लावून घेतले आणि तेथे एका संरक्षकाबरोबर कॉरॉफटॅप आला.

त्याला पाहताच कालफास्टोबानला आनंद झाला. पण ढोंगी रोषाने तो म्हणाला, 'याला येथे का आणलेस ?'

'त्याला काही समजले आहे. ते त्याला तुम्हालाच सांगायचे आहे. तिकडच्या अधिकाऱ्याला तो सांगेना. तेव्हा त्याने याला इथे पाठवले आहे. आपणालाच तो काय ते सांगेल.'

मग कालफास्टोबानने त्या रक्षकाला काहीतरी कामगिरीवर पाठवले आणि कोराफटॅपला विचारले, 'काय ?'

नंतर कॉम आणि टारझन यांच्याबद्दल त्याला सारे सांगून तो म्हणाला,

'जे गुलाम मेले ते आपोटाप आणि झौनथ्रोल नसून दुसरेच कोणी होते. ते जीवंत आहेत. त्यांना मी ओळखले आहे. आज ते खाणीत गेले होते.'

कालफास्टोबान विचारात पडला. पण त्याच्या हाती काय होते ? त्याने पलिकडच्या खोलीत कॉराफटॅपला पाठविण्यापूर्वी तो म्हणाला, 'तुम्ही ही गोष्ट राजाला किंवा जोहानथ्रोहागोला कळवा. ते मला मोठे बक्षिस देतील आणि मला शस्त्र वापरण्याची परवानगी द्या.'

'तुला शस्त्र ! गुलाम तू तुला शस्त्र देता येणार नाही.'

'पण आत्मसंरक्षणाकरिता.'

'बरे देतो ! त्या शेजारच्या खोलीतील एक घे. काराफटॅप त्या खोलीत गेला आणि एक लोखंडी पंजा त्याच्या मानेवर पडला. काराफटॅपला काय होतेय हे कळेना. पण त्याच्या कानाशी लागून टारझन म्हणाला,

'ज्याच्याबद्दल तू आता चहाड्या केल्यास तो मी. समजले.' आणि टारझनने त्याची मान पिळून त्याला एका कोपऱ्यात फेकले.

इतक्यात हामाडालबान कालोफास्टोबानच्या खोलीत आला व त्याने विचारले.

'ती गुलाम तुम्ही आणली आहे तिचे काय करणार? ती फार सुंदर आहे. तुम्ही तिला आपली बायको करा म्हणजे तिला उच्च दर्जा मिळेल.'

'अहं! मी तिला काही दिवस माझ्या सेवेत ठेवीन. मग तिला कुणाला तरी अधिक किंमतीला विकीन. मला ती फार स्वस्त मिळाली आहे.'

कालोफास्टोबानचे ते बोलणे ऐकून टारझनचा राग शिगेला पोहोचला, कॉमचा पण. टारझनला वाटले याची मान पण पिळावी पण ते अशक्य होते.

हामाडालबान इतक्यात कालोफास्टोबानचा निरोप घेऊन गेला आणि त्याने टालास्कारला आपल्यापुढे आणविले. किती सुंदर होती ती! कॉम थक्क झाला.

एखाद्या गर्विष्ठ सम्राज्ञीप्रमाणे ती पुढे आली आणि मान उंच करून उभी राहिली. गुलामांची नम्रता तिच्यात नव्हती.

'इकडे जवळ ये.'

'जवळ येण्याची गरज नाही.'

तो उठून जवळ आला व त्याने तिचा हात पकडला.

'हात सोड. तो तुझा घाणेरडा स्पर्श मला नको.'

'असे काय?' आणि त्याने तिला जवळ ओढले. ती त्याच्याशी झगडू लागली पण स्त्री पुरुषाबरोबर किती झगडणार?

मग तोच म्हणाला, 'जरा थांब तुला दाखवतो.' आणि तो तिला तिच्या खोलीकडे घेऊन गेला. जाता जाता म्हणाला. 'तुला आता कोंडून ठेवतो. मग पाहातो.'

इकडे टारझनचा संताप अनिवार झाला होता आणि कॉम त्याला दाबून धरीत होता. 'थांब आपण तिला सोडवू, पण आताच नको.'

पण तिच्या पांढऱ्या किंमती कपड्यात तिचे सौंदर्य जाईच्या फुलाप्रमाणे नाजूक दिसत होते. ते पाहून कॉम थक्क झाला. इतकी ही सुंदर?

कालोफास्टोबानने तिला त्या खोलीकडे नेले व तो तिच्याबरोबर झगडू लागला. तिच्यावर बलात्कार करण्याचा त्याचा बेत होता पण टारझनने कॅामला सांगितले.

'प्रथम ती दोन्ही दारे लाव.' आणि तो कालोफास्टोकडे धावला आणि त्याने त्याची मानगुट पकडली. 'सोड तिला! नाही तर तुझी मान मुरगाळतो.' पण तो पण कसलेला योद्धा होता. त्याने आपली तलवार उपसली पण त्याला वेळ न देता टारझनने आपली तलवार त्याच्या छातीत खुपसली व तो स्टोअररूमकडे येऊन म्हणाला,

'आता इथून निसटले पाहिजे पण कसे?' आणि एवढ्यात दोन्ही दारावर धक्के सुरू झाले कारण कालोफास्टोची किंकाळी बाहेर ऐकू गेली होती.

'चल! घाई कर!' दुसरी दोन दारे त्याने ओढून पाहिली ती बाहेरून बंद होती, 'आता काय इथेच मरायचे?'

इतक्यात टारझनचे लक्ष सेलिंगच्या मोठ्या भोकाकडे गेले.

'हे बघ इकडे. या भोकात लपू.'

'पण चढणार कसे?'

टारझनने काही विचार न करता त्या भोकात उडी घेतली. आता तो जंगलातला टारझन होता पण त्याची ती उडी पाहून कॉम व टालास्कार थक्क झाली पण थक्क व्हायलाहि वेळ नव्हता. टारझनने त्याला सांगितले, तिला वर घे! कॉमने तिला वर धरली व टारझने हात लांब करून तिला वर घेतली. नंतर तो म्हणाला,

'आता तू हात वर कर.' आणि त्या माळ्यावर ते बसले.

इकडे दारावर धक्के चालूच होते. आणि एक दार कोसळले. सर्व-जण—जे दारावर जमले होते ते—पुरुष व बायका आत शिरल्या. एकाने दुसरे दार उघडले, नंतर ते शोधू लागले. तोच एका खोलीच्या दाराशी कालोफास्टोचे आणि दुसऱ्या खोलीत काराफटॅपचे प्रेत आढळले पण हा अत्याचार करणारे कुठेच नव्हते. त्यांनी बराच शोध केला पण सेलिंगातल्या भोकाकडे कुणाचेच लक्ष गेले नाही आणि जाणार तरी कसे? मग आपणाशी तर्कवितर्क करीत ते सारे निघून गेले.

●●●

# अठरा

**माळ्यावरच्या** घाणीत ते बराच वेळ बसले होते. ते लोक जाताच आता त्यांना त्या माळ्यावरून सुटका करून घ्यायची होती. नाहीतर अन्नपाण्यावाचून मरायची पाळी आली असती. नंतर टारझन कॉमला म्हणाला,

'तुझ्याजवळच्या मेणबत्तीतील एक लाव.' त्याने मेणबत्ती लावताच त्यांना वाटले किती शतकाचा हा धुरळा आहे. पण या धुरळ्यावरून वाटते की येथे कोणी येत नाही पण इथून बाहेर पडायला मार्ग कसा सापडणार ?

नंतर टारझनने त्यांना सांगितले, 'मी असा सरळ निघतो व टोका-पर्यंत जाऊन पहातो, तुम्ही इथे थांबा.'

आणि टारझन रांगत रांगत तेथून निघाला. बराच वेळ झाला पण तो परतला नाही तेव्हा त्या दोघांना काळजी वाटू लागली. पण ते स्वस्थ राहिले. मेणबत्ती मात्र जळत होती. ती मेणबत्ती प्राणवायु सोड-णारी असल्यामुळे त्यांची धडगत होती.

थोड्या वेळाने त्यांना टारझनची चाहूल लागली व तो जवळ आला.

'चला आता येथून सरळ मार्ग आहे पण तो कुठे जातोय हे कळत नाही. पण तिथपर्यंत तर जाऊ.'

नंतर ते एका मागून एक मेणबत्त्या घेऊन निघाले. कित्येक दालने त्यांनी ओलांडली असावी. नंतर ते एका ठिकाणी आले आणि टाल-स्काराने किंकाळी फोडली. काय म्हणून ते पाहू लागले तर त्यांना भिंतीशी दोन माणसे बसलेली दिसली. इथे माणसे कशी? आणि कॉम पुढे झाला. खरोखरच मुंग्यांनी पोखरलेले ते माणसांचे सांगाडे होते. कुणीतरी सरदाराने गुप्तपणे मारलेले हे त्याचे शत्रु असावे. मिनुनियन्स आपल्या शत्रूंना असेच मारतात. ते थोडे पुढे गेले, तो भिंतीच्या बाजूबाजूंना त्यांना अशीच प्रेते दिसली पण या प्रेतांच्या कमरेला साखळदंड नव्हते.

'पण आता पुढे कुठे जायचे?'

थोडा वेळ तिघेही गप्प होते, नंतर त्यांना भिंतीतून माणसांचा आवाज ऐकू आला.

'ही कोण माणसे? इथे कुणी सरदार तर राहात नाहीत आणि मग टारझनने कानोसा घेतला, व म्हटले 'हा आवाज राजकन्या झांजराचा वाटतो आहे. मी एकदा तिचा आवाज ऐकला आहे. तिथे ती राहात असावी. मग येथून वाट मिळणे कठीण 'पण पहा ना? आवाज अस्पष्ट ऐकू येत आहे. आणि ते शेवटाला पोहोचले तोच त्यांना असे दिसले की त्या भिंती लाकडी तक्त्याच्या केल्या होत्या व आतून स्पष्ट आवाज ऐकू येत होता. टारझन म्हणाला, 'खाली एक खोली दिसतेय, पण ती काळोखी आहे. मी जाऊन येतो पहातो काय आहे ते!'

'नको, आपण दोघे तिथे जाऊ. एका तलवारीपेक्षां दोन तलवारी बऱ्या!'

'बरे चला.'

मग ते तिघे एकामागून एक खाली उतरले आणि तो आवाज स्पष्ट ऐकू येऊ लागला. राजकन्या झांजरा आपल्या दासीबरोबर बोलत

होती. ' मी त्या गुलामाला आपल्या ताब्यात घेणार होते पण त्या मूर्ख जौहानथ्रोलहागोने आणि त्याच्यापेक्षाहि मूर्ख असणाऱ्या माझ्या वडिलांनी त्याला आपल्याजवळ ठेवले. '

' पण तुम्हाला कशाला पाहिजे तो ? '

' दासीने हे प्रश्न विचारायचे नसतात. विचारशील तर डोके उडवीन. '

नंतर ती त्या दासीला म्हणाली, ' सकाळी सूर्य माध्यानीला येईपर्यंत मला उठवायचे नाही. आता तू जा. मला त्रास देऊ नकोस. '

' दासी जाताच राजकन्या आपल्या स्फटिकाच्या कोचावर पडली. मिनुनीयन्सच्या राज्यांत गाद्यागिरद्या नव्हत्या. कमी अधिक प्रमाणात आपल्या शय्येवर एकच वस्त्र टाकून ते झोपत.

टारझनने दार उघडले व तो आत जाऊ लागला. राजपुत्र कॉम म्हणाला,

' काय करतोस ? तुला नेहमी धोका पत्करायला हवा; पण मी भितो. '

' मी तिला आणतो. आपण चौघे पळून जाऊ किंवा तिला ओलीस ठेवून मी आपले स्वातंत्र्य मिळवीन. '

आणि टारझन त्या खोलींत शिरला. झांजरा झोपली होती की नाही कोण जाणे पण ती शांत पडली होती. टारझन पाऊल न वाजविता तिच्याजवळ गेला, तो मागचे दार एकदम आपटून बंद झाले आणि त्या आवाजाने झांजरा ताडकन उठली तो तिच्या पुढ्यात झौनथ्रोल उभा. बावरलेली झांजरा देहभानावर आली व म्हणाली;

' तूं गुलाम ? '

' होय मी ! तुला माझ्याबरोबर न्यायला आलो आहे. '

' मला ! राजकन्येला ? पण येते मी तुझ्याबरोबर. ' आणि ती याच्या गळ्यात हात टाकायला पुढे आली.

'मागे हो!' आणि ती मागे सरली.

'मी तुझ्यावर प्रेम करते. नेशील तेथे येईन.'

'पण मी तुझ्यावर प्रेम करीत नाही.'

'माझ्यासारख्या राजकन्येवर नाही. मग दुसऱ्या कुणावर? ती कोण आहे?'

'मी दुसरीवर प्रेम करतो; पण तो तुझा प्रश्न नाही. मी तुला न्यायला आलो आहे.'

'अस्सं! बरे येते तुझ्याबरोबर.' आणि तिने मागे पाहिले.

याच वेळी कोमोंडोक्लोरनसाल टालास्कारला म्हणत होता,

'पाहिलेस! तो तुझ्यावर प्रेम करतो. इथे दुसरे कोण आहे? मी या संकटात नसतो तर त्याच्या काळजात तलवार भोसकली असती.'

'वारे मित्र! आपल्या संरक्षकाला मारण्याची भाषा? चांगले!'

कॉम जरा नरम पडला.

'पण तू त्याच्यावर प्रेम करतेस?'

'प्रेमाच्या गोष्टी करायची ही वेळ नाही. चला.'

आणि कॉमने खोलीचे दार उघडायला आणि टारझन जमिनीतल्या गुप्त तळघरात पडायला एक गाठ पडली. कॉम भांबावला व टारझन आपणावर प्रेम करीत नाही, दुसरीवर करतो. हे कळताच झांजराने त्याचा सूड घेतला. वाट दाखवते म्हणून त्याला गुप्त तळघराच्या दाराशी आणले आणि त्याचा पाय त्या चौथऱ्यावर पडताच तो खाली गेला. आणि याचकरिता तिने त्याच्या मित्रांना आत येऊ दिले नव्हते. तोच राजपुत्र कॉम आत आला आणि त्याने झांजराचे मनगट पकडले.

'कुठे आहे माझा मित्र!'

आणि याच वेळी दोन आफ्रिकन मांजरींबरोबर टारझन युद्ध करीत होता. त्याच तळघरात एक माणूस बसला होता. तो टारझनला म्हणाला,

'मी तुला बाहेर जाण्याची वाट दाखवतो. तू या खोलीत ये. तो पहा बोल्ट.' आणि त्याच वेळी त्या मांजरीने त्याच्यावर हल्ला केला. टारझनने तलवार उपसली पण मागून दुसरी आफ्रिकन आक्राळविक्राळ क्रूर मांजरे आली. याच वेळी झांजरावर हल्ला चढवणारा कॉम त्या दुसऱ्या खोलीच्या दाराशी येऊन त्या तळघरात पडला. अगदी योग्य वेळी, आपल्या मित्रावर टारझनवर ती मांजरे हल्ला करणार त्याच वेळी. दोनहि मांजरे त्या दोघांच्या तलवारीला बळी पडली आणि आता झांजरा व टालास्कार समोरासमोर आल्या होत्या.

'अस्स! तीच का तू? जिच्यावर तो गुलाम प्रेम करीत होता? पण मी तुला त्याला लाभू दिले नाही. राजकन्या झांजराचा अपमान?' असे म्हणून तिने टालास्कार वर उडी घेतली आणि जमिनीवर पडून दोघी एकमेकींना भिडल्या. झांजरा टालास्कारच्या छातीत खंजीर खुपसण्याचा प्रयत्न करीत होती आणि टालास्कार तिचा प्रतिकार करीत होती. आपण काय करतो याची त्या दोघींनाही शुद्ध नव्हती. एकमेकींच्या बाहुपाशांत झगडत असलेल्या त्या गडबडत त्या तळघरातील त्या मांजरीच्या मध्यावर पडल्या.

●●●